शुक्रवार, 09 सप्टेंबर 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 40
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • FRIDAY 09 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-40 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-8 • PRICE-5

# २०२४ च्या निवडणुकीसाठी ममता मैदानात

## जाहीर केला निर्धार; म्हणाल्या मी, नितीश कुमार आणि...

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : देशात २०२४ च्या लोकसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. एकीकडे भाजपकडून यासाठी तयारी सुरू झाली आहे. त्यातच विरोधी पक्षदेखील लोकसभा निवडणुकीसाठी चांगलाच सक्रीय झाला आहे. यावरून आता पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी 'खेला होबे' म्हणत भाजप हटावची घोषणा दिली आहे. भाजपच्या पराभवाची सुरुवात पश्चिम बंगालमधून होणार आहे, असा निर्धार ममता बॅनर्जी यांनी केला आहे.**

"आता मी, नितीश कुमार, अखिलेश यादव, हेमंत सोरेन सर्व सोबत आले आहोत. जे लोक २७५ ते ३०० जागा निवडूण येतील म्हणून गर्वाची भाषा करत आहेत, त्यांना माहिती पाहिजे की, राजीव गांधीच्या जवळ ४०० लोकसभेच्या जागा होत्या. मात्र, राजीव गांधी त्या संभाळू शकले नाहीत.
लोकसभेला ३०० च्या खासदार निवडूण आणण्याची भाषा करणाऱ्यांना ५ राज्यांमध्ये १०० जागांवर पराभवाचा सामना करावा लागणार आहे. ईडी, सीबीआय, आयकर विभागाची भिती दाखवणाऱ्यांना जनतेचे सरकार धडा शिकवेल," असा



हल्लाबोल ममता बॅनर्जी यांनी भाजपवर केला आहे. विरोधकांना एकत्र करण्यासाठी नितीश कुमारांच्या भेटीगाठी दरम्यान, बिहारमध्ये नुकतीच भाजपची साथ सोडून नितीश कुमार यांनी राजदसोबत सत्ता स्थापन केली. तेव्हापासून नितीश कुमार विरोधकांना आणण्यासाठी प्रयत्न करत आहेत. नितीश कुमार यांनी तेलंगणाचे मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव, काँग्रेस नेते राहुल गांधी, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, माकपचे नेते सीताराम येचुरी यांची भेट घेतली आहे.

### जशी काय मी नोकर आहे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दिल्लीतील 'कर्तव्यपथ' परिसरात बांधण्यातलेल्या नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्याचे अनावरण होणार आहे. या कार्यक्रमाला पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री मता बॅनर्जी अनुपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी एखाद्या नोकराप्रमाणे निमंत्रण देण्यात आल्याचा आरोप ममता बॅंनर्जी यांनी केला आहे."मला काल एका उपसचिवाकडून या सोहळ्याचे निमंत्रण पत्र मिळाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी नेताजींच्या पुतळ्याचे अनावरण संध्याकाळी सात वाजता करणार आहे. त्याच्या एक तासापूर्वी हजर राहण्याच्या सूचना या पत्रात देण्यात आल्या होता. एका मुख्यमंत्र्यांला उपसचिव अशाप्रकारचे पत्र कसे लिहू शकतो? सांस्कृतिक मंत्री एवढे मोठे झाले आहेत का?" असा संतप्त सवाल कोलकात्यातील पक्षाच्या बैठकीत बॅनर्जी यांनी केला आहे. पक्ष कार्यालयातील नेताजींच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन मी कोलकात्याच त्यांना आदरांजली वाहिली, असेही बॅनर्जी म्हणाल्या आहेत. बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसिना यांच्या भारतभेटीवरूनही ममता बॅनर्जी यांनी भाजपावर निशाणा साधला आहे."बांगलादेशच्या पंतप्रधान भारतात असताना पश्चिम बंगालला डावलले जाण्याची ही पहिलीच वेळ आहे. हसिनाजींना मला भेटायचे आहे असे मला कळले आहे.



# आज लाडक्या गणपती बाप्पाला निरोप

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अवघ्या महाराष्ट्राचे लाडके दैवत असलेल्या गणरायाचे शुक्रवारी विसर्जन होणार आहे. अनंत चतुदर्शीच्या निमित्ताने राज्यभरातील घरगुती आणि सावर्जनिक मंडळाच्या गणपती बाप्पाला निरोप दिला जाणार आहे. विशेषतः मुंबईत गणेश विसर्जन सोहळ्याला मोठी गर्दी होईल. यादृष्टीने मुंबई पोलीस आणि वाहतूक पोलिसांनी जय्यत तयारी केली आहे. यासाठी मुंबईतील वाहतूक व्यवस्थेत मोठे बदल करण्यात आले आहेत. गणेश विसर्जनानिमित्त मुंबईतील एकूण ७४ रस्ते बंद राहतील. तर ५४ रस्त्यांवरील वाहतूक एकेरी करण्यात आली आहे.
गणरायांच्या मार्गक्रमणात कोणतेही विघ्न येऊ नये, यासाठी शुक्रवारी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत मुंबईत वाहतूक व्यवस्थापनासाठी पोलीस, वाहतूक विभाग आणि होमगार्डचे मिळून तब्बल १०,६०० कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. यामध्ये नागरी सुरक्षा दल, एनएसएस आणि आरएसपीच्या स्वयंसवेकांचाही समावेश असेल. तसे अनेक स्वयंसेवी संस्थांचे कर्मचारीही वाहतूक व्यवस्थापनासाठी प्रशासनाला मदत करतील.
सकाळी ९ वाजल्यापासून मुंबईतील ७४ रस्ते बंद होतील. तर ५४ रस्त्यांवर एकेरीच वाहतूक सुरु असेल. या रस्त्यांवर अवजड वाहनांना प्रवेशबंदी असेल. तर ११४ ठिकाणी गाड्या पार्क करण्यास मनाई असेल. मुंबईत सुमारे १२ हजार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे असून, दीड लाखांहून अधिक घरगुती गणेशमूर्तींचे विसर्जन गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशी दरम्यान केले जाते. यासाठी गिरगाव, दादर, वरळी, माहीम, वांद्रे, जुहू, वर्सोवा, अक्सा, मार्वे खाडी यासह विविध ठिकाणच्या ७३ नैसर्गिक विसर्जन स्थळी तसेच १६२ कृत्रिम तलावांच्या ठिकाणी पालिकेने विसर्जनाची तयारी केली आहे. तर वाहतूक पोलिसांनी गिरगाव, दादर, जुहू, मालाड मालवणी टी जंक्शन आणि गणेश घाट पवई यासारख्या महत्त्वाच्या विसर्जनाच्या ठिकाणी नियंत्रण कक्ष स्थापन केले आहेत. विसर्जनादरम्यान वाहतुकीचे नियमन व नियंत्रण करण्यासाठी महत्त्वाच्या ठिकाणी निरीक्षण मनोरे उभे करण्यात आले आहेत.

# मुसळधारेमुळे मुंबईत वाहतूक विस्कळीत

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुसळधार पावसाचा सलग दुसऱ्या दिवशी मुंबईकरांना फटका बसला आहे. आज संध्याकाळी झालेल्या मुसळधार पावसामुळे मध्य रेल्वेची वाहतुक कोलमडली आहे. लोहमार्ग पोलिस नियंत्रण कक्षाने दिलेल्या माहितीनुसार कळवा आणि मुंब्रा दरम्यान जलद मार्गावर पाणी साचलेल्याने त्या मार्गावरील लोकल वाहतुक ठप्प आहे. तर धीम्या मार्गावरही लोकल वाहतुक रखडली आहे.
ठाणे रेल्वे स्थानकात रेल्वे ट्रॅकवर काही ठिकाणी पाणी साचले आहे.गणपतीच्या काळात नेहमीपेक्षा जरा गर्दी कमी असली तरी ही कार्यालयहून परतण्याची वेळ असल्याने आणि त्यात लोकल सेवा रखडल्याने प्रवास करणाऱ्या रेल्वे प्रवाशांचे हाल झाले आहेत.
वेळापत्रक कोलमडल्याने कल्याणच्या पुढे कर्जत-कसारा लोकल वाहतुकीवरही परिणाम झाला आहे. नेहमीप्रमाणे लोकल ट्रेनमध्ये आणि रेल्वे स्थानकांवर उद्घोषणेचा अभाव असल्याने रेल्वे प्रवाशांमध्ये गोंधळाची स्थिती आहे. हार्बर, ट्रान्स हार्बर आणि पश्चिम रेल्वे मार्गावरील लोकल वाहतुक काहीशा उशीराने पण सुरळीत सुरु आहे.
मुंबई आणि आसपासच्या परिसरात बुधवारी सायंकाळी दमदार पाऊस कोसळल्यामुळे घरी जाणाऱ्या नोकरदारवर्गाचे हाल झाले होते. मागील चोवीस तासात सर्वाधिक पाऊस पूर्व उपनगरात



पडल्याची नोंद झाली आहे. दरम्यान, आज देखील ढगाळ वातावरण राहणार असून गडगडाटासह मध्यम पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला होता. गेल्या काही दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या पावसाने ऐन गणेशोत्सवाच्या शेवटी ही पुन्हा एकदा बरसायला सुरुवात केली आहे.

# पत्रकारांच्या समस्यांवर मुख्यमंत्र्यांसोबत बैठक:ना.संदीपान भुमरे


आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद : महाराष्ट्रातील पत्रकारांच्या न्याय हक्कांसाठी कार्य करणारे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या सोबत आता महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस सरकार भक्कमपणे उभे राहिले असून लवकरच पत्रकारांच्या समस्यांवर मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेण्यात येईल,असे आश्वासन राज्याचे रोहयो व फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे यांनी दिले.**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या औरंगाबादेतील विभागीय कार्यालयात गुरुवारी ना. संदीपान भुमरे यांच्या हस्ते श्रीगणेशाची आरती करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांची विशेष उपस्थिती होती. त्यांनी ना.संदीपान भुमरे यांना पत्रकारांच्या विविध समस्या सोडविण्याचे साकडे घातले. आपण सरकारमध्ये महत्वाचे घटक आहात. ग्रामीण पत्रकारांसोबत आपला कायम संपर्क असतो. त्यामुळे आपल्याला त्यांच्या समस्या माहीत आहेत. आता त्या सोडविण्यासाठी आपण पुढाकार घ्यावा, असे आवाहन वसंत मुंडे यांनी केले.
ना.संदीपान भुमरे यांनी लगेच मुंडे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत सांगितले की, मुख्यमंत्री 12 सप्टेंबरला पैठणला येणार आहेत. यावेळी मी पत्रकारांच्या मागण्यांसंदर्भात त्यांच्यासोबत चर्चा करतो व शक्य झाले तर 17 सप्टेंबरला मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी आपली बैठक आयोजित करतो आणि जर या दिवशी शक्य झाले नाही तर वर्षा बंगल्यावर बैठक आयोजित करतो आणि आपल्या समस्या सोडविण्याचा नक्कीच प्रयत्न करतो, असा शब्द शेवटी ना. भुमरे यांनी दिला.
यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ .प्रभू गोरे, संघटक विलास शिंगी, उपाध्यक्ष छब्बुराव ताके, कोषाध्यक्ष मुकेश मुंदडा, प्रसिद्धी प्रमुख मनोज पाटणी, ज्ञानेश्वर तांबे, सागर भोसले, पैठण तालुकाध्यक्ष शिवाजी गाडे, उपाध्यक्ष अनिस पटेल, ज्ञानेश्वर बावणे आदींसह पत्रकारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या औरंगाबादेतील विभागीय कार्यालयात राज्याचे रोहयो व फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या हस्ते श्रीगणेशाची आरती करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ.प्रभू गोरे, संघटक विलास शिंगी, उपाध्यक्ष छब्बुराव ताके, कोषाध्यक्ष मुकेश मुंदडा, प्रसिद्धी प्रमुख मनोज पाटणी, ज्ञानेश्वर तांबे, सागर भोसले, पैठण तालुकाध्यक्ष शिवाजी गाडे,उपाध्यक्ष अनिस पटेल, ज्ञानेश्वर बावणे आदी.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# शाश्वत शिक्षणाची गंगोत्री...

एक स्वयंशिस्तच मुलांच्या अंगी बाणलेली दिसते. शाळेचे आवार , व्हरांडा, वर्ग सारे काही स्वच्छ. सगळ्यांच्या चपला, बूट वर्गाबाहेर रांगेत काढलेले. एखादी दुसरी चप्पल चुकून इकडे तिकडे झाली तरी एखादा विद्यार्थी स्वतःच ती व्यवस्थित लावून ठेवेल. शाळेतील व्हरांड्यातील आणि वर्गातील भिंती बोलक्या. तिथल्या चिमुरड्यांनी केलेल्या विविध प्रोजेक्ट्स च्या साक्ष देणाऱ्या भिंती. अशी शाळा असू शकते अशी मी स्वप्नातही कल्पना केली नव्हती. या शाळेची माहिती मला लोकसत्तेत आलेल्या एका लेखातून मिळाली. आणि तेव्हाच मी ठरवले की ही शाळा बघायला आपण जायचेच. त्या लेखाच्या शेवटी लेखकाचा इ मेल दिलेला होता. त्यावरून त्यांच्याशी संपर्क साधून शाळेचा पत्ता आणि फोन नं मिळवला. या शाळेचे संचालक अतुल गायगोले यांच्याशी संपर्क साधला. आणि त्यांना मला



शाळा बघू देण्याची विनंती केली. त्यांनीही मोठ्या आनंदाने, ' सर, कधीही या. आपले स्वागत आहे. ' या शब्दात मला परवानगी दिली. मी त्यांच्या संपर्कात गेल्या सहा महिन्यांपासून होतो. पण जायचा योग येत नव्हता. पण २०२०च्या जानेवारी महिन्याच्या अखेरीस मला ही संधी मिळाली. आणि मी या शाळेत हजर झालो. अतुल सरांनी मला स्टेशनवर घेण्यासाठी शाळेतीलच सचिन सावळकर यांना पाठवले. आणि माझी राहण्याची देखील व्यवस्था केली. दुसऱ्या दिवशी सकाळी मी त्यांच्यासोबतच शाळेत दाखल झालो. पाहताच प्रेमात पडावे अशी ती शाळा होती. मी वर वर्णन केल्याप्रमाणे सगळी आनंदी, निरागस चेहऱ्याची मुले, मुली शाळेत बागडत होती. कोणीही त्यांच्यावर  रडत नव्हते. ओरडायची गरजही नव्हती. जेव्हा एखादी गोष्ट आतूनच येते, तेव्हा ती सांगावी लागत नाही. खर तर शिक्षणक्षेत्रात ३५ वर्षे काम करून सेवानिवृत्त झालेल्या माझ्यासारख्या शिक्षकाला हा आश्चर्याचा धक्काच होता. त्यामुळे मी वेगवेगळ्या पद्धतीने माझ्या नजरेतून ही शाळा पारखून पाहिली. पण सगळ्या कसोट्या अपूर्ण पडल्या. शाळा या सगळ्या मापदंडात बसणारी नव्हती. किंवा दुसऱ्या शब्दात सांगायचे तर त्या सगळ्या कसोट्याना पुरून उरणारी होती.  **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

# करिअर निवडीतून आत्मिक आनंद मिळावा

आधुनिक केसरी

प्रत्येकाच्या जशा गरजा वेगवेगळ्या असतात तसेच उत्पन्न अथवा आपल्या हाती येणारा पैसा देखील कमी-अधिक प्रमाणात आपल्या पदरी पडत असतो. खरे कसब आपल्या करिअर निवडण्यात असते. जो योग्य करिअरची निवड करतो तोच अर्थार्जन उत्तम प्रकारे करू शकतो. आपण निवडलेल्या करिअरचा केवळ गरजेपुरता आणि अर्थार्जनासाठी उपयोग करून चालणार नाही, तर करिअरमधील स्थिरता आणि आत्मिक आंनद मिळवण्याचे तंत्र अवगत केले पाहिजे. यासाठी आपण प्रत्येक बाबतीत चिकित्सा केली पाहिजे. करिअरची निवड करण्यापूर्वी आपल्या गरजांची योग्यता, त्यांची आपण करत असलेली अपेक्षा आणि त्यांची पूर्तता या सर्वच बाबींचा आपण अभ्यासपूर्वक विचार करणे महत्वाचे असते. अनेकदा आभासी दुनियेत मशगुल झालेल्यांना स्वतःचे चांगले-वाईट कळत नाही.  आजच्या गतिमान, आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात अन्न, वस्त्र आणि निवारा या किमान प्राथमिक गरजांचा विचार करून फक्त चालत नाही, तर बदलत चाललेल्या जीवनमुल्यांचाही स्विकार करावा लागतो. आज आपल्या आयुष्यातील प्रत्येक सुखात आणि दुःखात आपल्याला शारीरिकदृष्ट्या साथ-सोबत करणारे, मानसिक आधार देणारे, अंतर्मनाला धीर देणारे, आर्थिकदृष्ट्या सक्षमता देऊ करणारे, सामजिक पत निर्माण करणारे, शैक्षणिक प्रगतीची दिशा दाखवणारे, कौटुंबिक एकोपा टिकवणारे, आपली नातीगोती जपणारे, उणीवा दूर करणारे, आपल्या जाणीवा जपणारे, आपल्या जाणीवांना नेणीवेपर्यंत घेवून जाणारे, आपल्या जीवनात अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारे आपले हक्काचे साधन हे दुसरे-तिसरे कोणतेही नसून ते म्हणजे आपले करिअर अर्थात "अर्थार्जनासाठी निवडलेला आपल्या आवडीचा मार्ग" असतो. करिअरची निवड करण्यासंबंधीचा सखोल अभ्यास केला नाही आणि केवळ आभासाला भुलून निर्णय घेतला तर, त्याचे परिणाम आयुष्यभर भोगावे लागतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## दिसे विटेवरी | आत्मरूप ||

मनीचे तरंग | आत्ममग्न व्हावे ||
अंतरी रूजावे  शांतीब्रह्म ||१||

एकांती घडावा | आत्म्याशी संवाद ||
आणिकांशी वाद | नको जीवा ||२||

तुटता तुटेना | पाश विकारांचा ||
त्यात संसाराचा | घोळ सारा ||३||

पिढीजात दुःख | जहागिरी माझी ||
काळा भीती तुझी | कैसी सांग ||४||

एकतारी गुंजे | देहाच्या गाभारी ||
दिसे विटेवरी | आत्मरूप ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी


**सरसिजनिलये सरोजहस्ते**
**धवलतमांशुकगन्धमाल्यशोभे ।**
**भगवतिहरिवल्लभे मनोज्ञे**
**त्रिभुवनभूतिकरिप्रसीदमह्यम् ॥**

भगवती हरिप्रिये, तू कमलवनात निवास करतेस. तुझ्या हाती लीलाकमल सुशोभित आहे. तू अत्यंत उज्ज्वल वस्त्र, गंध आणि माला आदींनी शोभून दिसतेस. तुझे रूप मनोहर असे आहे. त्रिभुवनाचे ऐश्वर्य प्रदान करणाऱ्या हे देवी, तू माझ्यावर प्रसन्न हो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



## सगुणभजन

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आठ दिवसाच्या गॅंप नंतर आज "दासबोध"निरूपण लिहायला घेतले. दररोज आपले काही तरी चुकत आहे याची सतत जाणीव होत होती पण समर्थानी सांगितले आहे की "आधी प्रपंच करावा नेटका"या वाक्याने अंगात शक्ति येत होती गणपती गौरीच्या आगमनाची तयारी व सण यामुळे लिहायला विलंब झाला सर्वाची क्षमा मागते व 'सगुणभजन'या समासाच्या समारोपाकडे येते.  आपण आता पर्यन्त अभ्यासलो आहोत की 'मी कर्ता'असे कधीही म्हणू नये . माझ्या हातून जे जे कर्म झाले ते ते  ईश्वरेच्छा होती ,परमात्म्याने माझ्या कडून ते कार्य करून घेतले असे मानले पाहिजे. नाही तर समाजातील काही लोक.स्वतः कडे असे कर्तेपण घेतात की चंद्र सुर्य पण माझ्या  सांगण्या वरून प्रगट होतात व मावळतात. असे बढाईखोर लोकांच्या बुध्दीची 'कीव'करावीशी वाटते. असे बाता मारणारे लोक आपण आजुबाजुला पहातो. सगुणभजन या समासात समर्थानी असे सांगितले आहे की"ईश्वर कर्ता आहे"  **(क्रमशः)**

आधुनिक केसरी

# पैसा नीतिधर्माने मिळवावा

काळजीचे काही कारण नसताना काळजीत राहण्याचे काहींना व्यसन असते. व्यवहारात काळजी हा मोठा विकल्प आहे. पैसा असल्यामुळे जर काळजी वाटू लागली, तर तो पैसाच दूर केला तर नाही चालणार ? पैसा टाकून देऊ नका, पण पैशाच्या प्रेमातही राहू नका. जिवापाड श्रम करून जो कमवायचा, तोच जर दुःखाला कारण होऊ लागला तर काय उपयोग ? पैसा काही आयुष्याचे सर्वस्व नव्हे, किंवा सर्वश्रेष्ठ ध्येय नव्हे. व्यवहारामध्ये जीवनाला पैसा आवश्यक आहे; आणि तो नीतीने वागून आपल्या पोटापुरता कमावणे जरूर आहे. पैसा मिळवावा हे व्यवहारदृष्ट्या योग्यच आहे, पण जर तो मिळाला नाही तर आपले जीवन व्यर्थ आहे असे कोणी समजू नये. पैसा आला तर भगवंताच्या इच्छेने आला, आणि यदाकदाचित तो गेला, तर भगवंताच्या इच्छेने गेला, असे म्हणून, आपले समाधान बिघडू देऊ नये. पैसा गेला म्हणून काही अब्रू जात नाही; आपली अब्रू आपल्या आचरणावर अवलंबून असते. अशी म्हण आहे की, 'पैसा पुरून उरावा इतका मिळावा.' पण आपल्याला जगात काय आढळते ? जीवनामध्ये पैसा आपल्याला पुरतो आणि आपल्या उरावर नाचतो. हे काही 'पुरून उरणे' नव्हे. याच्या उलट, आपण त्याला पुरावे आणि त्याच्या छातीवर नाचावे. मनुष्य नेहमी म्हणतो की, 'माझ्या मुलाबाळांची तरतूद मला केली पाहिजे; मी काय, आज आहे आणि उद्या नाही.' पण आपण जसे खात्रीचे नाही,



तशी आपली मुलेबाळे तरी कुठे खात्रीची आहेत ? ही गोष्ट माणसाच्या लक्षातच येत नाही.

पैशाबद्दल रामचंद्राला उदासपण आले, असे योगवसिष्ठात वर्णन आहे. तसे ते आपल्यालाही लागू आहे; फरक एवढाच की, रामाचे उदासपण पैसा 'असणेपणाचे' होते, आणि आपले उदासपण पैसा 'नसणेपणाचे' आहे. पैसा नसल्याबद्दल आपल्याला उदासपण आहे, कारण तो प्रपंचातल्या सुखाचे साधन वाटते. पण त्याबरोबरच भगवंत हवा असेही आपल्याला वाटते. आता, आपण आपल्या पैशाचे बरोबर दोन भाग करू. आपल्याला प्रपंचाला लागेल इतका पैसा प्रामाणिकपणे मिळवून आपण जगावे. जास्तीची हाव करू नये. हा झाला आपला पैसा; अर्थात, राहिलेला सगळा दुसऱ्याचा. त्याचा लोभ करू नये. श्रीमंत मनुष्य हा पैशासाठी, म्हणजे लक्ष्मीसाठी, सर्व जीवन खर्च करतो. पण ती त्याचा मुळासकट नाश करते. म्हणून नारायणाच्या स्मरणात लक्ष्मी मिळवली, की ती आपला नाश न करता, आपल्या आनंदाला कारण होते.

आजचे बोधवचन आहेः  पैसा हा नीतिधर्मानेच मिळवावा; तो वाटेल त्या मार्गाने मिळवणे इष्ट नाही. श्रीराम समर्थ

## ।। हात येथूनी जोडतो ।।

देवा तुझ्या दारापुढे उभी मोटारींची रांग
पायी आलो दर्शनाला, आत कसा येऊ सांग ?

देवा तुझ्या दर्शनाला मंत्री आणि नेते येती
बंदुका रे आम्हावरी, त्यांचे रक्षक रोखती.

देवा तुझ्या दर्शनाला फळे मिठाईची दाटी
कुठे लपवावी सांग गूळ-खोबऱ्याची वाटी

देवा तुझ्या मुकुटात सोने आणि लाख हिरे
माझ्या हातातले नाणे ओशाळून मागे फिरे

देवा तुझ्या अंगावर रोज नवीन दागिना
समजेल का तुला, माझी उपाशी वेदना

देवा तुझ्या पायाखाली आता चांदीची रे वीट
तुझ्या दर्शनाचे फाडे, तुझा पुजारी तिकीट

देवा तुझ्या मंदिराची वाट जुनी ही सोडतो
तुला ठेवतो हृदयी, हात येथूनच जोडतो. ....

# करोना अजून किती काळ टिकणार ?

आधुनिक केसरी

करोना संदर्भातील निर्बंध उठवल्यानंतर जनतेचे दैनंदिन आयुष्य रुळावर आले आहे. अनेकांकडून तर मास्क, सॅनिटायझर, सामाजिक अंतर या करोना नियमावलीचे पालनसुद्धा करण्यात येत नाही. समाजातून करोना संपला, असा समज नागरिकांचा झालेला दिसत आहे. मात्र, याबाबत शास्त्रज्ञांनी सावधानतेचा इशारा दिला आहे. करोना संकट आणखी काही काळ जगावर घोंगावू शकते, असा इशारा शास्त्रज्ञांकडून देण्यात आला आहे. १९१८ सालातील 'फ्लू' साथीपेक्षाही करोनाची साथ जास्त काळ टिकू शकते, असा अंदाज शास्त्रज्ञांकडून व्यक्त करण्यात आला आहे.

करोना साथीवरील लशींच्या बुस्टर डोसमुळे नागरिकांमधील रोगप्रतिकारक शक्ती वाढली आहे. अमेरिकेत सध्या BA.4.6 या ओमिक्रॉनच्या नव्या विषाणूने थैमान घातले आहे. आठ टक्के लोकांना या विषाणूची बाधा झाली आहे. BA.5. या विषाणूपेक्षाही अत्यंत वेगाने ओमिक्रॉनचा हा नवा विषाणू रोगप्रतिकारक शक्तीवर हल्ला चढवत आहे. या विषाणूचा प्रसार मोठ्या प्रमाणात होण्याची शास्त्रज्ञांना भीती आहे. करोना आपल्यासोबत आयुष्यभर असेल, असे व्हाईट हाऊसचे करोना साथींचे समन्वयक डॉक्टर आशिष झा यांनी म्हटले आहे. या विषाणूचा प्रसार काही विशिष्ट भागांमध्ये सातत्याने होत राहिल, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. लशींना अद्ययावत करणे थांबवले, या साथीच्या उपचारांकडे दुर्लक्ष केले, तर भविष्यात करोना लढ्यात आपण मागे पडू, अशी भीती झा यांनी व्यक्त केली आहे. करोनामुळे लोकांमध्ये गंभीर आजारांचे निदान होण्याची शक्यता आहे. यावर खबरदारीचा उपाय म्हणून नव्या ओमिक्रॉन विषाणूवर काम करणाऱ्या बुस्टर डोसची निर्मिती केली जात आहे. हा बुस्टर डोस येत्या नोव्हेंबरपर्यंत बाजारात उपलब्ध होण्याची शक्यता आहे. ओमिक्रॉनच्या नव्या विषाणूची १.३ दशलक्ष लोकांना बाधा होण्याची शक्यता शास्त्रज्ञांनी वर्तवली आहे. या काळात पावणेदोन लाखांवर मृत्यू होण्याची भीतीदेखील वर्तवण्यात आली आहे. करोना विषाणूमध्ये काही काळापासून सातत्याने लक्षणीय बदल होत आहेत. मात्र, हे बदल कायम होत राहतील, असे शास्त्रज्ञांना वाटत नाही.

"जगातील अनेक लोकांमध्ये प्राथमिक प्रतिकारशक्ती नसते. एक तर त्यांना या विषाणूची बाधा होत नसावी किंवा ते लसीकरणापासून दूर असावेत" असे अमेरिकेच्या रोचेस्टरमधील 'मायो' क्लिनिकच्या विषाणूशास्त्र विभागाचे संचालक मॅथ्यू बिन्नीकॅर यांनी म्हटले आहे. प्रतिकारशक्तीची पातळी लक्षणीयरित्या वाढल्यास संसर्गाचा दर आणि त्यामुळे उदयाला येणाऱ्या नव्या विषाणूंच्या संख्येत घट होईल, अशी माहिती शास्त्रज्ञांनी दिली आहे. करोना साथीची लस आणि त्याचा बुस्टर डोस घेतल्यास या विषाणूंचा प्रसार रोखता येऊ शकतो.

"करोना विषाणूला रोखण्याची क्षमता आपल्यामध्ये आहे. यापासून होणाऱ्या मृत्यूंवरदेखील आपण नियंत्रण मिळवू शकतो. करोनाची बाधा झाल्यास सातत्याने उपचार आणि लस घेतल्यास करोनाचा प्रसार थांबू शकतो", असे मत डॉ. आशिष झा यांनी व्यक्त केले आहे. या लशींमुळे केवळ करोनापासून संरक्षणच होत नाही, तर त्यामुळे प्रतिकारशक्तीदेखील वाढते, असे झा यांनी सांगितले आहे. दरम्यान, मास्क, सॅनिटायझर आणि सामाजिक अंतर या त्रिसूत्रीचे पालन करण्याचे आवाहन शास्त्रज्ञांनी केले आहे.

# कायद्यांना माणुसकीची जोड हवी



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

एक जेष्ठ नागरिक आपली पेन्शन उचलायला बॅंकेत गेले. काऊंटरवर त्यांनी विड्रावल स्लीप आणि पासबुक दिले. कॅशियर ने त्यांना टोकन दिले आणि बसायला सांगितले. एक तासा नंतर त्यांचा टोकण नंबर आला. ते काऊंटरवर गेले तर त्यांना तुम्हाला पैसे मिळणार नाहीत. तुम्ही जिवंत असल्याचे प्रमाणपत्र घेऊन या असे सांगण्यात आले. त्यांनी आपले आधारकार्ड आणि पॅनकार्ड ओरिजनल दाखवले, तरी ते ऐकायला तयार नव्हते. शेवटी नाईलाजाने ते 73 वर्षांचे काका काठी टेकवत, स्वतः ला सांभाळत निघून गेले. तीनचार दिवसांनी ते परत बॅंकेत आले. त्यांनी पैसे काढायची स्लीप, पासबुक आणि जिवंत असल्याचे प्रमाणपत्र दिले.

त्या कॅशियर ने मख्खपणे फक्त स्लीप घेतली आणि बाकी मागितले तर दाखवा असे सांगून टोकण दिले आणि बसायला सांगितले. एक सव्वा तासाने टोकण नंबर आला. ते आजोबा काऊंटरवर गेले तर तो कॅशियर म्हणाला काका हे ठिक आहे. पण आपण मागचे वर्षी पण जिवंत होतात हे रेकॉर्ड वर नाही आहे. ते दिल्याशिवाय तुम्हाला पैसे देता येणार नाहीत. मग ते आजोबा भडकले, म्हणाले मी प्रत्यक्ष तुमचे समोर उभा आहे. माझे ओरिजनल आधार कार्ड, पॅनकार्ड देखिल मी दाखवत आहे. यापेक्षा मी जिवंत असल्याचा दुसरा पुरावा आजून काय हवाय आपणास. तीथे जमलेली मंडळी ही हसायला लागली. तरी तो कॅशियर मख्खपणे निर्विकार पणे म्हणाला ते सगळे मला समजते, पण कायद्याने रेकॉर्ड वर आम्हाला सर्व ठेवावे लागते. नाहीतर ऑडिटर रिमार्क मारतात आणि आम्हाला भोगावे लागते. मी कांही नाही करू शकत. काय करावे हे त्या आजोबांना कळत नव्हते, ते काकुळतीला येऊन विणवत होते. म्हणाले आहो मी एकटा राहतो. बायको कधीचीच देवाघरी गेली मला सोडून, मुलं परदेशात असतात. औषधी संपली आहेत, मी तीन दिवस झाले या जिवंत असण्याच्या प्रमाणपत्रासाठी भटकतो आहे. माझ्या वयाचा तरी विचार करा. मी आज जिवंत आहे याचे प्रमाणपत्र आणले आहे नां. म्हणजे मी मागच्या वर्षीही जिवंत होतो हे सिध्द होत नाही काय आणि मग मागचे वर्षी का नाही आडवलेत मला त्यासाठी. आज जिवंत आहे हे येवढे लिहून आणून देऊन ही असे काय करताय. पण ते कॅशियर ऐकायला तयार नव्हते. कांही लोक त्यांना घेऊन मॅनेजर कडे गेले तर ते म्हणाले. मी हे सर्व समजू शकतो. पण नियमाला मी अपवाद नाही करू शकत. तुम्ही मागचे वर्षीही जिवंत होतात हे प्रमाणपत्र तुम्हाला आणावेच लागेल. दरवर्षी कशाला सांगावे लागावे. गेली दहा बारा वर्षे तुम्ही पेन्शन उचलताय नां, मग. शेवटी तीन दिवसात हवे असलेले प्रमाणपत्र आणून देतो, असे लिहून घेऊन, त्यांना मॅनेजर कडे आणणाऱ्या लोकांपैकी दोघांच्या साक्षीदार म्हणून सह्या घेऊन त्यांना औषधांपूरते पैसे काढायची परवानगी देऊन तोडगा निघाला. वर त्या आजोबांना दम देण्यात आला की तीन दिवसात न दिल्यास खाते वापरू देणार नाही. हे झाले इथले. जेथून जिवंत असल्याचे सर्टीफिकेट मिळवायचे होते तेथील मजा तर वेगळीच आहे.. ते आजोबा परत दोन वेळा सर्टिफिकेट घ्यायला म्हणून संबंधीत ऑफिस मध्ये गेले. तीन दिवसांपूर्वीच हयातीचा दाखला घेतलेला होता म्हणून थोडा परिचय झालेला होता ,त्यामुळे ते ऑफिसर ओळखतील असे समजून आजोबा तीथे गेले.

तो अधिकारी आधी खेकसला. परवाच तर दिले तुम्हाला जिवंत असल्याचे प्रमाणपत्र मग आता परत काय ? काका म्हणाले आहो त्या बॅंकेने मागचे वर्षी पण मी जिवंत होतो याचा ही पुरावा म्हणून तसे सर्टिफिकेट मागितले आहे. ते म्हणाले तसे देता येत नाही. कारण मागच्या वर्षी तुम्ही जिवंत होतात याचा आज काय पुरावा आहे तुमचे कडे ?



आणि बॅंकडेटचे सर्टिफिकेट देण्याची आमचेकडे पध्दत नाही.

तुम्ही माझे समोर उभे आहात हे ठीक आहे पण मागचे वर्षी जिवंत होतात हे यावरून सिध्द होत नाही. ते आजोबा म्हणाले आहो साहेब मी बॅंकडेटेड मागतच नाही आहे. आजच्याच डेटचे द्या फक्त त्यात लिहा आमचे माहीती नुसार हे मागचे वर्षी पण जिवंत होते. तो ऑफिसर एकदम खेकसला, आहो मी ऐकुन घेतो म्हणून तुम्ही काहीही बरळाल काय? मी आज कोणत्या आधारावर तुम्ही मागचे वर्षी पण जिवंत होतात हे ठरवू. आहो आमचे ऑडिटर फाडून खातील मला. माझी नोकरी जाईल. माझी मुलं मुली अजून लहान आहेत हो, त्यांचे शिक्षण चालू आहे. माझी नोकरी गेली तुमच्या मुळे तर मी काय खाऊ, संसार कसा चालवू. बायको मुलांचे कसे संगोपन करू. मी असली रिस्क नाही घेणार तुमच्या तुटपुंज्या पेन्शन साठी, जा तुम्ही. ते आजोबा काकुळतीला येऊन बोलले आहो हवे तर माझ्या शेजाऱ्यांना मी घेऊन येतो, ते सांगतील तुम्हाला गेली वर्षभर ते मला जिवंत असल्याचे पहात आहेत ते. ते ऑफिसर बघले नाहीत. ते म्हणाले ते लाख म्हणतील हो , पण तो काय पुरावा नाही होऊ शकत. कागदोपत्री पुरावा हवाय. ते आजोबा रडकोंडीला आले, विनवण्या करायला लागले इतर ही लोक साहेबांना म्हणायला लागले आहो साहेब द्या की त्यांना प्रमाणपत्र. उगाच कशाला ताणताय त्यांना या वयात. आहो तुम्हीपण निवृत्त झालात की तुम्हालाही हे फेस करावेच लागणार आहे. शेवटी ते आजोबा म्हणाले साहेब, गेली वर्षभर मी माझे बॅंक खाते वापरत आहे, तेंव्हा तुम्ही कोणी अडवले नाही मग आजच का ही अडवणूक. हे तुम्ही तुमच्या बॅंकेत जाऊन बोला, आम्हाला बोलून काय उपयोग. हताश होऊन ते आजोबा परत बॅंकेत जायला निघाले. तीथे गेले तर बॅंकेचे एन्ट्री डोअर बंद होते. मागच्या दाराने ते कसेबसे शाखेत गेले तर सेक्युरिटीवाला म्हणाला आहो आजोबा वेळ संपली आहे. उद्या या. तरी त्यांनी विनंती करून मॅनेजरला भेटायचा हट्ट धरला. शेवटी कशीबशी मॅनेजरची भेट झाली. ते ही म्हणाले उद्या या. आजची वेळ संपली. एव्हाना आजोबा थोडे धिट झाले होते. ते म्हणाले साहेब काय बोलताय तुम्ही ट्रॅन्झॅक्शन आवर्स संपले असतील. पण बॅंकेची वेळ तर साडेपाच पर्यंत आहे ना. मी पैसे काढायला नाही आलेलो. मला तुमचेशी बोलायचे आहे. मी तीथे गेलो होतो मागच्या वर्षाचे सर्टिफिकेट मागायला तर ते म्हणाले तुम्ही मागचे वर्षी जिवंत होतात याचा कागदोपत्री पुरावा घेऊन या. माझ्या शेजारी राहणारे तीनचार लोक सांगत होते की काका आमचेच बिल्डिंग मध्ये शेजारीच राहतात, गेली पन्नास वर्षे आम्ही त्यांना ओळखतो. ते मागच्या वर्षी पण जिवंत होते. हवे तर त्यांचे सह आम्ही ही शपथपत्र स्टॅम्प पेपरवर करून देतोत. पण ते ऐकायला तयार नाहीत. आपण या शाखेत गेली तीन चार वर्षे आहात. मी नियमीत खाते वापरतो. त्यावेळी मला कोणीही हयातीचा दाखला मागितला नाही. मग आत्ताच का ही अडवणूक. ते म्हणाले खाते तुमचे आहे तुम्ही हवे तसे वापरू शकता. पॅनकार्ड नंबर, आधारकार्ड नंबर दिलात की झाले. तुम्हाला आम्ही सांगितले होते की पेन्शन खाते स्वतंत्र ठेवा आणि ईतर व्यवहार वेगळ्या खात्यातून करा म्हणजे हा प्रश्न येणार नाही. फक्त पेन्शन खात्यालाच हयातीचा दाखला द्यावा लागतो. शेवटी त्यांच्या शेजारी राहणारे सुपरक्लासवन ऑफिसर आणि एक उद्योजक त्यांचे मदतीला आले. त्यांनी काकांसाठी स्वतः चे अ‍ॅफेडेविट करून दिले. आणि ते मागच्या वर्षीही जीवंत होते हे आमचे म्हणने खोटे निघाल्यास आम्ही काकांनी त्यांचे खात्यातून काढलेल्या पैशांची आम्ही जबाबदारी घेतो. शिवाय त्यांच्या पेन्शन ची रक्कम खात्यात ठेऊन इतर रक्कम ते काढतील. असे लिहून देऊन शेवटी हा विषय मिटला.


# गणपती विसर्जन

आधुनिक केसरी

**बघता बघता बाप्पा सोबतचे हे दिवस कसे निघून गेले कळलच नाही आत्ता आला होतास बाप्पा आणि निघालास पण तुझ्या गावी बाप्पा तू पाहुणा म्हणून न येता इथेच राहायला आला तर रोज तुझ्या सेवेत सारे दुःख विसरायला होईल.**

गणपती विसर्जन म्हटल की सोशल मीडियावर बघितलेला एक वीडियो आठवतो त्या वीडियोत ती लहान मुलगी गणपती बाप्पाला घेऊन जाताना बघते आणि त्याच्या मागे रडत रडत धावते तिचे रडणे बघून जणु आपल्या डोळ्यातले पाणी सुद्धा थांबत नाही. विसर्जनाच्या दिवशी बाप्पाचा चेहरा पण उतरलेला असतो त्याला पण जावे वाटत नाही तो ही दहा दिवसात इथे रमतो बाप्पाला निरोप द्यायला लहानापासून तर मोठ्यांपर्यंत सर्वांची गर्दी असते जसा आला तेव्हा स्वागत केले न अगदी तसेच बाप्पा जातो तेव्हा केले जाते ढ़ोल ताशाच्या गजरात मिरवणूक काढून गुलालाची उधळन केली जाते सार्वजनिक मंडळाची मूलं फेटा किंवा डोक्याला पट्टी बांधून फिरताना दिसतात घराघरातील स्त्रियांची तर नुसती धावपळ असते उकडीचे मोदक गोड़ धोड नैवेद्य बाप्पासाठी केला जातो बाहेरून डीजेचा आवाज आला की घरातील गणपतीला नैवेद्य दाखवून मनोभावे पूर्ण श्रद्धापूर्वक पूजा आरती करून बाप्पाला हात जोडून प्रार्थना केली जाते की बाप्पा जसा यावर्षी आलास न तसा पुढच्या वर्षी पण लवक़र ये पाटावर गणपती मुर्ती ठेऊन सार्वजनिक मंडळाच्या गणपतीची पण घरातील स्त्रीच्या हातून मनोभावे पूजन करून घरातील गणेश मुर्ती त्या मंडळाच्या मूर्तिजवळ ठेऊन बाप्पाला निरोप दिला जातो वाजत गाजत नदीवर गणपती बाप्पाला विसर्जनासाठी नेऊन तिथे बाप्पाची आरती केली जाते नंतर सर्व मंडळातील सदस्य मूर्तिला हात लाऊन गाड़ीतुन गणेशमुर्ती खाली उतरवून नदीत घेऊन जातात पांच वेळा गणेश मुर्ती पाण्यात खाली वर करून गणपती बाप्पाला निरोप दिला जातो असा हा गणपती विसर्जनाचा दिवस कधी येउच नये असे सर्वांना वाटते त्या दिवशी सर्वांचे चेहरे नाराज असतात की बाप्पा आता जाणार, कारण बाप्पा हा विघ्नहर्ता आहे आपल्या कामात येणारे विघ्न फक्त बाप्पाच दूर करतो अगदी काही काम होत नसेल तर दर मंगळवरी गणपती स्त्रोत्र वाचावे आणि बाप्पाला मनातील इच्छा बोलून दाखवावी ते कार्य नक्की सिद्धिस जाते अशीच बाप्पाची कृपा आपल्या सर्वांवर राहो हीच प्रार्थना...

**कु. कविता आधार चव्हाण**
म्हसावद जि जळगाव 9370062031



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739


# ‘आनंदाच्या गावा जावे’

आधुनिक केसरी

डॉ. मीना श्रीवास्तव ठाणे,
संपर्क. ९९२०१६७२११

**विश्वास सरांच्या विविधरंगी लेखणीतून साकारलेले त्यांचे जुलै २०२२ मध्ये प्रकाशित झालेले पुस्तक वाचले. त्यांच्या लेखणीला असे विविधरंग प्राप्त होण्याचे कारण, त्यांचे विविध विषयांवरील अफाट वाचन, गहन चिंतन आणि अनवरत मनन असावे, असा मला विश्वास आहे! बरे, नुसते वाचन करतील ते विश्वास सर कसले? कारण त्यांची जबरदस्त निरीक्षणशक्ती, जी, हे जेथे जातात तेथे यांच्या सांगाती असतेच असते.**

मी हे 'निरीक्षण' यासाठी नोंदवीत आहे, की या बहुल-विषय सामग्रीने सुसज्जित पुस्तकात असलेले विषय! पुस्तकातील समग्र ३९ लेख वाचले, अन पुस्तक वाचल्यावर मी माझ्या अल्पमतीने त्यांना कांही श्रेणींमध्ये विभागले अन ते-ते विषय परत चाळले. ते लेख असे (कंसात लेखांची संख्या दिली आहे): प्रेरणादायी व्यक्तिचित्रे (११), शिक्षण आणि तत्वज्ञान (११), भक्तिरसपूर्ण लेख (५), समाजबोध (४), संगीत (३), आरोग्य (२), कविता (२) आणि साहित्यिक विनोद (१). अर्थात या श्रेणी ढोबळ मानानेच विभागल्या आहेत. या माहितीचा हेतू इतकाच की, लेखकाने या पुस्तकात हाताळलेले बहुरंगी आणि बहुढंगी विषय आपल्यापर्यंत पोचावेत. यावरून हे लक्षात येते की प्रत्येक जाणत्या अन नेणत्या, तसेच प्रत्येक वयोगटातील वाचकासाठी या पुस्तकात कांही ना कांही आहे, इतकंच काय, ज्यांना विविध विषयांवर ललित साहित्य वाचायची आवड आहे, त्या वाचकांसाठी तर ही अत्यंत पौष्टिक तसेच रुचकर साहित्यिक मेजवानीच समजावी. अर्थात आभासी मेजवानीचे महत्व आपण जाणतोच, विचारांना खाद्य (food for thought) पुरवायचे असेल तर या पुस्तकाला पर्याय नाही असेच मी म्हणेन. आता यातील सर्वाधिक लेख असलेले विषय बघू या. लेखकाचे स्वतःचे व्यक्तिमत्व प्रेरणादायी आहेच, याचा अनुभव त्यांनी आजवर लिहिलेल्या पुस्तकांतून, लेखमालांमधून, रेडिओवरील आणि प्रत्यक्ष भाषणांतून आपल्याला येतच असतो. त्याच अनुभवाचे संपन्न रूप या ११ लेखातून प्रकर्षाने जाणवते. मोजकी उदाहरणे द्यायची तर यांत आदर्श व प्रसिद्ध व्यक्ती (अंधत्वावर मात करून कर्तृत्वाने आकाशदीप झालले राहुल देशमुख, बहुआयामी शिक्षणाच्या धनी डॉक्टर शारदा बापट, आपल्या हृदयसिंहासनावर सदैव अधिष्ठित छत्रपती शिवाजी महाराज इत्यादी) आहेतच. परंतू आधी अप्रसिद्ध असून देखील लेखकाच्या सानिध्याने आणि या पुस्तकाच्या पानांवर आता अधिष्ठित होऊन प्रसिद्ध झालेल्या व्यक्ती अधिक आहेत. त्यांच्या हरहुन्नरी आणि विशेष कर्तृत्वाची दखल घेऊन लेखकाने त्यांचा यथोचित सन्मान केलाय, याबद्दल मी सरांचे आणि त्या व्यक्तींचे मनःपूर्वक अभिनंदन करते. यात लेखकाची चोखंदळ अभिरुची दिसते. कारण या व्यक्ती विविध




क्षेत्रातील आहेत. उदाहरण द्यायचे तर आधुनिक रामदास, हे सामान्य असूनही असामान्य सामाजिक कार्य करणारे! आणि माळे गुरुजी. अशाच इतरही व्यक्तींचा मनोज्ञ वेध लेखकाने घेतलाय! सजीव व्यक्तिचित्रण तर सरांचे बलस्थान. म्हणूनच त्या सर्वांना जणू भेटण्याचे समाधानच लाभावे इतक्या त्या सरांनी आपल्या सहज सुंदर ओघवत्या लेखनातून जिवंत केल्या आहेत. या पुस्तकाचे मला तरी हेच सर्वोच्य आनंदाचे निधान वाटले.

आता अन्य श्रेणीकडे वळू या. शैक्षणिक विषय आणि तत्वज्ञान हे तर सरांचे त्यांच्या स्वतःच्या शैक्षणिक अनुभवाचे लाडके विषय! यामुळे ते लिहितांना लेखकाला अन वाचतांना वाचकांना आनंदाचे डोही आनंदतरंग असा अनुभव आला नाही तरच नवल! अशिक्षित कोण (उदा.बहिणाबाई), उन्नयन विचारांचे अन भावनांचे, कौशल्यासुत (हा राम नाही, पण कौशल्य नसेल तर कधी-कधी जीवनात राम नाही हा सरांचा एकदम अनवट विचार!) कोण कुणाजवळून शिकले ही मला अत्यंत भावलेली भावस्पर्शी गोष्ट, (पाश्चात्त्य असूनही आपल्या हृदयाचा संपूर्णपणे ठाव घेणारी) एका शिक्षिकेची अन तिच्या टेडी या विद्यार्थ्याच्या हृदयंगम नात्याची. मंडळी, आपण शिक्षक असा किंवा विद्यार्थी, या संपूर्ण कथेचे वाचन हा दैवी अनुभव हे आणखी एका अश्रूभरल्या आनंदाचे पान! मंडळी, आता ज्या प्रकरणाचा उल्लेख करते ते शेवटचे आणि अतिशय वाचनीय, कारण संपूर्ण पुस्तकातील सर्वात अधिक पानांचे म्हणून नव्हे, तर ध्येयनिश्चितीच्या मार्गावरील पायऱ्या, खाचाखळगे आणि मळलेल्या वाट सोडून देखील मार्गक्रमण कसे करता येईल याचे विस्तृत, सुनियोजित, परखड आणि अनुभवपूर्ण, तरीही पायरी-पायरीने वृद्धिंगत होणारे रोमांचकारी विवेचन. कारण प्रत्येक पायरीच्या पुढे काय विचार असेल याची उत्सुकता! हे शीर्षक वाचून हे समस्त प्रकार विद्यार्थ्यांकरिता राखीव असावेत असे मला (उगीच) वाटले, मात्र, मित्रांनो मला यात मला पहिला धडा हाच मिळाला की बाह्यरंगावर (शीर्षक) जाऊ नका, अंतरंगात जाऊन बघाल तर या परीस आनंदाचे क्षण नोहे! विश्वास सर, या शेवटच्या भागात आपण आनंदाचेच नव्हे तर आपल्या लेखनकौशल्याचे देखील शिखर गाठलेत बरं का!

आता इतर भागांविषयी लिहिणे म्हणजे डुप्लिकेट पुस्तक छापल्यासारखे होणार. शिवाय आपल्याला पुस्तक वाचायला प्रवृत्त करणे हा माझा प्रमुख उद्देश आहे. सरांची लालित्यपूर्ण भाषा म्हणजे त्यांच्यासारखीच साधी, सुलभ आणि सर्वांना आपलीशी वाटणारी. क्लिष्ट शब्दांचे आणि अवजड कल्पनांचे जाळे नसल्याने या सुगम आणि नितांतसुंदर साहित्याचा आस्वाद प्रत्येक जण घेऊ शकेल. अभिजात लेखन वजनदार असलेच पाहिजे असे नाही. शिक्षकी बाणा जपत त्यांनी हे ललित लेखन असे केले आहे की मागील बाकावर बसलेल्या मस्तीखोर किंवा ढ विद्यार्थ्याला देखील याचे आकलन होईल. किंबहुना हाडाच्या शिक्षकाचे टार्गेट बहुदा हेच विद्यार्थी असतात. साहित्याच्या बाबतीत मी पण बॅकबेंचर होते. म्हणूनच या पुस्तकाबद्दल मला विशेष प्रेम निर्माण झाले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. असो, आपण कोठेही बसा मित्रांनो, मल्टिप्लेक्समधील मेगास्क्रीनप्रमाणे हे सर्व लेख तुमच्या डोळ्यांचे अन हृदयाचे पारणे फेडणार यात मला कुठलीच शंका नाही. या पुस्तकाच्या शीर्षकाविषयी माझे मत मांडते. यात आनंदाच्या वाटाच वाटा आढळतील. कुठलेही पान उघडा, ३-४ पानांत आनंदाचे दार उघडलेलं दिसणार. आपण फक्त चालायचे काम करा (चालण्यावर देखील एक धडा हाय! चालतंय की म्हणून, न चालणाऱ्यांसाठी खास आहेर!) आणि सरांच्या ऋजू व्यक्तिमत्वासमान मृदू, मुलायम भाषेत सूचना आहेत. (त्यांचा आवाज ऐकायला मिळाला असता तर तलत सारख्या असे म्हटले असते) योग, व्यायाम, सामाजिक कर्तव्ये, जबाबदाऱ्या आणि बरंच कांही! आपण म्हणतो ना, व्यक्ती तितक्या प्रकृती, तसेच या पुस्तकातील व्यक्तिरेखांनी त्यांच्या प्रेरणादायक आयुष्यात आनंद शोधलाय. काहींच्या जीवनात अपार दारिद्र्य, हाल, कष्ट, मेहनत, या सर्वांत देखील आनंद असतो हे या पुस्तकाच्या वाचनातून कळले. मला तर हे पुस्तक वाचतांना असे वाटले की आपण एका अत्यंत रमणीय अशा उपवनात विहार करतोय! त्यात दिसलेत काटेरी विविधरंगी गुलाब, जाई-जुई या जुळ्या बहिणी, रंगीबेरंगी शेवंती, नाजूक पारिजातक, धुंद गंध असलेला सोनचाफा, कमलिनी आणि कुमुदिनी वगैरे वगैरे, एक विसरलेः बकुळीची नाजूक फुले देखील दृष्टीस पडली की! यांच्या मनमोहक रंगांचा अन मनोवेधक गंधांचा किती अन कसा आस्वाद घ्यावा हा प्रश्नच होता. पण एकदा उपवनाची मालकी मिळाली की, कधीही अन कितीही वेळा हे अवर्णनीय सुख अनुभवता येईल याचा आनंद आहे. अन शेवटी जाता जाता आठवले ते निराळेच, या उपवनाची हिरवीजर्द वाट चाळीगावावरून सुरु झाली, दूर-दूर गेली आणि परत मुक्काम पोस्ट, आनंदाचे गाव, म्हणजे चाळीसगावातच येऊन थांबली की! विश्वकर्मा पब्लिकेशन्सनी प्रकाशित केलेलं हे पुस्तक विकत घ्या, वाचा आणि दुसऱ्यांना भेट द्या, हेच आजच्या दिनाचं आनंदवनभुवन समजा!

# पुरोगाम्यांचा दांभिकपणा उघड

आधुनिक केसरी

अश्विनी टेंबे

**बिल्किस बानो.... वाचक हो हे प्रकरण आता तुम्हा आम्हाला नक्कीच नवीन राहिलेलं नाही. त्यामुळे त्याची पुन्हा उजळणी करणे श्रेयस्कर नाही. या प्रकरणातील त्या 12 ेषींना शिक्षेतून मिळालेली सुट... हा सध्या वादाचा मुद्दा ठरत आहे. अनेक पूरोगामी चिारवंत आपली इतर महत्वाची कामे सोडून या प्रकरणात विनाकारण नायक असल्याची भूमिका घेत आहेत. ना त्यांना त्या बिचाऱ्या बिल्किस बद्दल काही वाटत, नाही त्या सुटलेल्या 12 जणांबद्दल... अर्थात कुठलाही गुन्हा हा समर्थनीय नाहीच. त्यातही बलात्कारासारखा तर नाहीच नाही. पण कधी...?**

जर तो गुन्हा प्रत्यक्षात घडला असेल तर..... म्हणजे.... यात आश्चर्य वाटण्याजोगं काहीच नाही. या प्रकरणातील नेमकं सत्य सांगण्याचा हा खटाटोप नक्कीच नाही. किंवा कुठल्याही राजकीय पक्षाच्या दडपणाखातर काहीतरी खरडण्याचा अट्टाहासही नाही. कारण घटना घडली त्यावेळी तुम्ही आम्ही कुणीच प्रत्यक्षदर्शी घटनास्थळावर नव्हतो. त्यामुळे गुन्हा घडला होताच आणि गुन्हा घडला नव्हताच असं कुणीही ठामपणे सांगू शकणार नाही. पण ज्याप्रमाणे गुन्हा घडला असल्याच्या शक्यतांवर असंख्य पूरोगामी आपले मत प्रचंड सक्षमपणे मांडत असतील तर गुन्हा घडला नसल्याच्या काही शक्यतांवर एक बारीकशी नजर टाकण्यास काय हरकत आहे. तर गोध्रा हत्याकांड आणि त्यावेळी गुजरातेत झालेल्या दंगलीमध्ये बिल्किस बानो नावाच्या पाच महिन्याच्या गरोदर महिलेवर 12 जणांनी सामुहिक बलात्कार केला आणि तिच्या तीन वर्षांच्या मुलीचं डोकं आपटून तिला ठार केलं... असा दावा बिल्किस बानोनं तिस्ता सेटलवाड आणि तिच्या कंपूने केला. यापूर्वीही तिस्ता सेटलवाड यांच्याविरुद्ध गुजरात मधील हत्याकांडा नंतरच्या दंगलीत खोटे साक्षी पुरावे उभे करुन गुलमर्ग सोसायटी व बेस्ट बेकरी प्रकरणात निरपराध हिंदूंना गोवल्याबद्दल तसेच तात्कालीन गुजरात सरकार विरुद्ध बदनामीकारक मोहिमा चालवल्याबद्दल त्यांची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयीन आदेशानुसार गुजरात पोलिसांनी तिस्ता सेटलवाड यांना अटक करुन त्यांची चौकशी सुरु केली आहे. सर्वोच्च न्यायलयाचा निर्णय दोन प्रकरणाबाबत असला तरी त्या कालावधीतीतील अशा सर्व घटना या खोटे साक्षी पुरावे देवून उभे केल्याचे मान्य करावेच लागले. त्यामुळेच बिल्किस बानो हे प्रकरण देखील कपोलकल्पित आहे, अशी कोणतीही घटना घडलीच नव्हती. सेटलवाड यांनी हा सगळा बनाव रचला होता हे मान्य करण्यावाचून पर्याय नाही. हे सिद्ध करणारे काही मुद्दे : 1. या काळातील तिस्ता सेटलवाड यांचे अत्यंत जवळचे सहकारी रईस खान यांनी जाहीर मुलाखत देवून तिस्ता या फिर्यादी व साक्षीदारांना कशी खोटी साक्ष द्यायला शिकवत होत्या हे टीव्ही चॅनेल्सना जाहीर मुलाखत देवून सांगितले आहे. 2. बिल्किसवर कथित बलात्कार करण्यासाठी या 12 आरोपींना पोलीस सब इन्स्पेक्टर आय ए सय्यद सामील होते असा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला. एक मुसलमान पोलीस अधिकारी 12 हिंदूंना एका मुस्लिम महिलेवर बलात्कार व तिच्या मुलीची हत्या करण्यासाठी मदत करेल हे पटण्यासारखे आहे काय? 3. या खटल्यात बिल्किसने एकूण तीन वेळा तपास यंत्रणांसमोर साक्ष दिलेली आहे आणि तिन्ही वेळा ती वेगवेगळी होती. कारण अर्थात अशी घटना घडलीच नव्हती असे मानायला पुरेसा वाव आहे. 4. बिल्किसच्या म्हणण्याप्रमाणे तिच्या सालेह नावाच्या मुलीला तिच्या हातून हिसकावून घेवून दगडावर आपटून ठार मारण्यात आले. मात्र आश्चर्याची गोष्ट अशी की, 2004 मध्ये सीबीआय चौकशी सुरु होईपर्यंत घटना घडल्यापासून म्हणजेच 2002 पासून बिल्किस बाने आपल्या सलाह नावाच्या मुलीबद्दल काहीच बोलली नव्हती. 5. या दोन वर्षात आपण एकूण 21 जणांना आपल्या मुलीच्या हत्येची घटना सांगितल्याचे बिल्किस बानो सांगतात. पण त्या 21 च्या 21 जणांनी न्यायाधीशांसमोर शपथेवर सांगितले की, बिल्किस बानो यांनी त्यांना ही घटना कधीच सांगतली नव्हती. आता प्रश्न आला तो 12 दोषींचा, जर त्यांनी हा गुर्न्हा केला नव्हता तर त्यांनी याबाबत दाद मागण्याचा प्रयत्न का केला नाही....? तर याचं एक महत्वाचं कारण म्हणजे दुर्दैवाने हा खटला गुजरातमधून महाराष्ट्रात वर्ग केला गेला. देशाच्या एका राज्यातील न्यायव्यवस्थेवर अविश्वास दाखवण्याचा हा अजब प्रकार पहिल्यांदाच देशात घडला होता. नंतर सत्र न्यायालय व उच्च न्यायालयाने अक्षरशः ओढून ताणून शिक्षा दिली. या शिक्षेविरुद्ध एखाद दुसरा आरोपी सर्वोच्च न्यायालयात गेला पण तिथे त्यांचेही अपील फेटाळले गेले. त्यामुळे अन्य आरोपींनी दाद मागण्याचा प्रश्नच येत नाही. साहजिकच उच्च न्यायालयाचा निर्णय हा दुर्दैवाने अंतिम ठरला. सुरुवातीला गुजरात पोलीस या प्रकरणाचा तपास करत होते परंतु त्यांच्यावर अविश्वास दाखवून न्यायालयीन आदेशाने हे प्रकरण एप्रिल 2004 मर्ध्ये सीबीआय कडे वर्ग केले. सीबीआयने चौकशी सुरु केली आणि त्याची दिशा भलतीकडेच भरकटली. आरोपींना अडकवायचे हा त्या चौकशीचा हेतू होता. जो सफल झाला. दोषींना शिक्षेतून मिळालेली सुट आधुनिक जगात गुन्हेगाराला सुधारण्याची संधी देण्यावर भर आहे. म्हणूनच फौजदारी प्रक्रिया संहितेत कलम 432 नुसार शिक्षेत सूट/सवलतीची तरतूद आहे. एखाद्या दोषीने 14 वर्षापेक्षा जास्त कारावास भोगला असेल तर तो या कलमान्वये सूट मिळवण्यास पात्र ठरतो. या सर्वांनी 18 वर्षे तुरुंगवास भोगून ही अट पूर्ण केलेली आहे. या प्रकरणामध्ये सीबीआय तर्फे तपास करणारे अधिकारी विवेक दुबे यांनी सदर आरोपींची तुरुंगातील वर्तणूक प्रशंसनीय असल्याने त्यांची सुटका झाल्याचे स्पष्ट रुपाने दिसते असे ठासून सांगितले. संहित कलम 432 हे कलम सर्व गुन्ह्यांना लागू आहे. अगदी खून, बलात्कार यांनाही हे लागू आहे. कायद्यातील कलम हे कोणत्याही शासकीय धोरणापेक्षा वरचढ असते. अशा विषयात राज्याचा/केंद्राचा निर्णय अंतिम असतो त्यात फारच मर्यादित कक्षेत न्यायालये हस्तक्षेप करु शकतात. तसेंच या निर्णयाने शिक्षेत फक्त सूट मिळाली आहे, शिक्षेला माफी दिलेली नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाने यातील एका दोषीच्या याचिकेत आदेश देताना शिक्षेत सूट देण्याचा निर्णय गुजरात सरकारने घ्यावा, महाराष्ट्र सरकारने नाही, असे स्पष्ट केले. त्यानुसार सर्व कायदेशीर प्रक्रिया पाळून निर्णय झाला, ज्यात काहीही चूक नाही. अर्थात या प्रकरणात शिक्षेतून सूट ही पूर्णपणे कायदेशीर प्रक्रिया पाळून घेतलेला निर्णय आहे. गुजरात उच्च न्यायालयातील फौजदारी वकील अन्वय हुसेन शेख यांनी या प्रकरणी गुजरात राज्य सरकारवर होत असलेल्या टीकेचा खरपूस समाचार घेत ही टीका म्हणजे मा. न्यायालयाचा अवमान आहे असें जाहीर मुलाखतीत सांगितले आहे. शिक्षेत सूट मिळणं हे पहिल्यांदा घडलेलं नाही.* माजी पंतप्रधान राजीव गांधींच्या हत्येतील एक दोषी, पेरारीवेलन याची नुकतीच अगदी याच कलमांतर्गत तामिळनाडू विधानसभेच्या शिफारशी वरुन जन्मठेपेतून सुटका झाली आहे. * अभिनेता संजय दत्त याचाही गुन्हा खूपच गंभीर होता. देशात झालेल्या दहशतवादी कारवाया संदर्भातील शस्त्रास्त्रे त्याच्याकडे सापडली होती. असे असूनही त्यालाही या कलमान्वये शिक्षेत सुट देण्यात आली होती. * याकूब मेननच्या फाशीचंही जन्मठेपेत रुपांतर करावं अशी मागणीही इथल्या पूरोगाम्यांनी केली होती. * काश्मीर, पंजाबमध्ये ज्यांनी हिंदूंचा नरसंहार केला, अशांना तात्कालीन काँग्रेसच्या सरकारने मोठमोठ्या कार्यक्रमांना मानाने आमंत्रित केलं होतं. या सगळ्या पार्श्र्वभूमीवर त्या 12 दोषींना त्यांच्या शिक्षेत मिळालेली सूट इतकी महत्वाची आहे की, आपण सूज्ञ मंडळीही त्यावर इतक्या मोठ्या प्रमाणात उहापोह करतो आहोत. बिल्किस प्रकरण हिंदू व गुजराविषयी असल्यानेच हा सारा गहजब केला जात आहे. यातून देशातील पूरोगामी विचारवंतांचा दांभिकपणा उघडा पडला यात शंका नाही.

# पार्श्वगायिका ते विनोदी कलाकार : टुनटुन

आधुनिक केसरी

अफसाना लिख रही हूं दिल ए बेकरार का' हे गाणं जवळपास सगळ्यानीच ऐकलं असेल. पण हे गाणं टून टून नी गायलं असेल हे खूप कमी लोकांना माहिती असेल. कारण टून टून ही कॉमेडियन म्हणूनच आपण सर्वश्रुत आहोत. हिंदी चित्रपटातील पहिली कॉमेडियन. खरं तर टून टून पार्श्वगायिका होण्यासाठी मुंबईला आली होती. अभिनय वगैरे असं काही तिच्या डोक्यात नव्हतं. उमा देवी खत्री असे खरे नाव टून टूनचे होते. टून टून हे नाव नर्गिसने तिला दिले होते. तिच्या अचूक विनोदी टायमिंग मुळे तिला हे नाव मिळालं होतं.

टून टूनचे लहानपण खूप गरिबीत गेले. टून टून ही उत्तर प्रदेशातील अमरोहा जिल्ह्यातील छोट्याशा गावातील. ती अडीच वर्षाची असतानाच तिच्या आई वडिलांचा आणि भावाचा जमिनीच्या वादातून खून झालेला. टून टून त्यावेळी अडीच वर्षाची असल्यामुळे शेवट पर्यंत तिला कळलं नाही की तिचे आई वडील आणि भाऊ दिसायला कसे होते.



सुरेश सिरसीकर
संपर्क क्र. 9146040000

टून टून वयाच्या २३ व्या वर्षी घरातून पळून मुंबईत आली आणि संगीतकार नौशाद अलीचा दरवाजा ठोठावला. तिने त्याला सांगितले की ती गाऊ शकते आणि जर त्याने तिला संधी दिली नाही तर ती स्वतःला समुद्रात फेकून देईल. त्याने तिची ऑडिशन घेतली आणि तिला जागेवर कामावर घेतले. तिने नाझीरच्या वामिक अझरा (१९४६) मध्ये एकल पार्श्वगायिका म्हणून पदार्पण केले. तिने लवकरच निर्माता-दिग्दर्शक ए.आर.सोबत करार केला. कारदार, ज्यांनी नौशादचा संगीत दिग्दर्शक म्हणून वापर केला आणि नूर जहाँ, राजकुमारी, खुर्शीद बानो आणि जोहराबाई अंबालेवाली यांसारख्या संगीत दिग्गजांमध्ये स्वतः साठी स्थान निर्माण केले. तिला पुढे मेहबूब खानचा अनोखी अदा (१९४८) मिळाला, ज्यात पुन्हा "काहे जिया डोले" आणि "दिल को लगाके हमने कुछ भी ना पाय" असे दोन हिट गाणे आले. यामुळे तिला उच्च दर्जाच्या पार्श्वगायकांच्या रांगेत आणले. जेमिनी स्टुडिओ, मद्रास यांनी बनवलेल्या दिग्दर्शक एस.एस. वासन यांच्या चंद्रलेखा (१९४८) मध्ये गायिका म्हणून तिने शिखर गाठले. तिची सात गाणी, ज्यात "सांझ की बेला" सारख्या हिट गाण्यांचा समावेश आहे, ती तिच्या गायन कारकिर्दीतील सर्वात यशस्वी काम आहे. निर्माता-दिग्दर्शक कारदार यांच्या सोबतचा करार तोडल्यामुळे तिचे इंडस्ट्रीतील भाग्य कमी होत गेले. शिवाय, पुढील वर्षांमध्ये, तिच्या जुन्या गायन शैलीमुळे आणि मर्यादित गायन श्रेणीमुळे, तिला लता मंगेशकर आणि आशा भोसले या उदयोन्मुख गायन तारेशी स्पर्धा करणे कठीण वाटले. अखेरीस नौशादने तिला अभिनय करण्यास सुचवले, कारण तिचे व्यक्तिमत्व खूप बडबड होते आणि कॉमिक टाइमिंग खूप छान होते. तीला दिलीप कुमार प्रचंड आवडत होता. अभिनयाची सुरुवात ती दिलीपकुमार अभिनित चित्रपटातूनच करणार होती. दिलीप कुमारवरील या वेड्या प्रेमाबद्दल जाणून घेतल्यावर, नौशादने दिलीप कुमार, जो त्याचा मित्र होता, तिला त्याच्या एका चित्रपटात कास्ट करण्यास सांगितले आणि ती त्याच्यासोबत 'बाबुल' (१९५०) मध्ये दिसली, ज्यामध्ये नर्गिस मुख्य नायिका होती. तिनेच तिच्या कॉमिक व्यक्तिरेखेला अनुसरून तिचे "टुन टुन" असे नामकरण केले. हे नाव तिच्यासोबतच राहिले आणि एक विनोदी आख्यायिका जन्माला आली. तिच्या लोकप्रियतेमुळे, टून टून हे नाव आजही भारतातील जाड महिलांसाठी संबोधलं जातं. तिने आर पार (१९५४), मिस्टर अँड मिसेस '55 (१९५५) आणिप्यासा (१९५५) यांसारख्या गुरू दत्तच्या क्लासिक्समध्ये अभिनय केला. १९६० आणि १९७० च्या दशकात, ती अनेक बॉलीवूड चित्रपटांमध्ये कायमची कॉमिक रिलीफ होती. काही वर्षांनी, तिने सर्वात उल्लेखनीयपणे अमिताभ बच्चन यांच्यासोबत नमक हलाल (१९८२) मध्ये अभिनय केला, जो प्रकाश मेहरा ब्लॉकबस्टर आहे. तिच्या पाच दशकांच्या कारकिर्दीत, तिने भगवान दादा, आघा, सुंदर, मुकरी, धुमाळ, जॉनी वॉकर आणि केश्तो यांसारख्या तिच्या काळातील टॉप कॉमेडी कलाकारांसोबत हिंदी/उर्दू आणि पंजाबी इत्यादी भाषांमधील सुमारे १९८ चित्रपटांमध्ये काम केले. ती शेवटची कसम धंधे की (१९९०) मध्ये हिंदी चित्रपटांमध्ये दिसली होती. २३ नोव्हेंबर २००३ रोजी अंधेरी, मुंबई वयाच्या ८० व्या वर्षी तिचे दीर्घ आजाराने तिचे निधन झाले.

# परळीतील नंग्या नाचामुळे मोक्कारांच्या भावना सुखद अनावर ..! खुर्च्यांचा ढीग साचला तरी नाही भानावर ..!

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**परळी :** परळी मध्ये नाथ प्रतिष्ठान आयोजित गणेशोत्सवाच्या सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये रोज एका नव्या सांस्कृतिक तथा नाच-गाण्यांच्या मेजवानीमुळे माजलेल्या काही मोकार कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाची पुरती बदनामी करून टाकली. केकची घटना घडल्यानंतर आज पुन्हा एका बेभान गाण्यावरती यांच्या भावना ईतक्या उफाळल्या की, त्यांनी थेट खुर्च्याच उधळल्या. एवढेच नाही तर या खुर्च्या आपटून-आपटून मोडत खुर्च्यांचा ढीग साचला तरी भावना अनावर झालेले हे जनावर काही केल्या भानावर यायला तयार नव्हते. या अशा उद्रेकी कार्यकर्त्यांमुळे गेल्या 18 वर्षापासून परळी मध्ये विना गालबोट सुरू असलेल्या या नाथ प्रतिष्ठान आयोजित गणेशोत्सवच्या सांस्कृतिक कार्यक्रमाला आज प्रथमतः चांगलेच गालबोट लागल्याचे दिसून आले. एका या प्रकारामुळे महोत्सवाची मात्र मोठी नामुष्की संपूर्ण मराठवाडाभर झाली असून यापुढे तरी गणेश उत्सवात अशा प्रकारचे कलाविष्कार ठेवावेत की नाही असा प्रश्न आयोजक-संयोजकांना नक्कीच पडला असेल....?

एकीकडे उन्माद अल्पवयीन मोकाट सुसाट वेगाने खुर्च्या मोडत असताना पोलीस कुठल्या खुर्च्यांमध्ये एवढे तल्लीन होऊन बसले होते. जेणेकरून अगोदरच पोलीस खात्याची प्रतिमा मलीन असताना त्यामध्ये आणखीनच वाढ होईपर्यंत पोलिसांना हा प्रकार कसा दिसला नाही?

मुळातच या ना त्या प्रकारामुळे पोलीस खाते बदनाम आहे. शंभरा (100) मागे केवळ दहा खराब कर्मचाऱ्यांमुळे अगोदरच पोलीस खात्याची प्रतिमा मलिन असताना. येथे बंदोबस्तासाठी असलेले पोलीस कर्मचारी असे खुर्च्यात बसून कशात एवढे तल्लीन होते....? जेणेकरून आहे त्यापेक्षा आपल्या खात्याची प्रतिमा मलिन होईपर्यंत त्यांचे या उच्छाद मांडणाऱ्या प्रकाराकडे लक्ष गेले नाही. असाही शंकास्पद प्रश्न या ठिकाणी निर्माण झाला आहे.

रोजच्या त्या प्रचलित दैनंदिन जीवनामध्ये कुठेतरी विरंगुळा मिळावा. एक वेगळा आनंद मिळावा या हेतूने नाथ प्रतिष्ठान दरवर्षी वेगवेगळे अभिनेते वेगवेगळ्या अभिनेत्र्या आणि ईतर कलाविष्कारांच्या कलाकारांना बोलावून परळीकर व परिसरातील जनतेला आनंद देण्याचा प्रयत्न करत असते. परंतु त्यांचा हा प्रयत्न



आता कुठेतरी फसतो आहे? असेच चित्र या कालच्या प्रसंगावरून दिसून येत आहे. नव्हे स्पष्ट होत आहे. कारण अगोदरच व्यसनाधीन होत चाललेली तरुणाई कुठेतरी अशा कलाविष्कारांकडे स्वच्छ भावनेने पाहण्याऐवजी त्याकडे वासनानंद नजरेने पाहू लागल्यामुळे त्यांचा या कार्यक्रमाकडे पाहण्याचा दृष्टिकोन भलताच होऊन बसलेला दिसून येत आहे.

### अठरा वर्षाखालील मुलांना कार्यक्रमात प्रवेश दिलाच कसा ?

नाथ प्रतिष्ठान आयोजित या सांस्कृतिक कलाविष्कार कार्यक्रमांमध्ये आयोजक-संयोजकांनी नियम डावलीत अठरा वर्षाखालील तरुणाईला मुळात प्रवेश दिलाच कसा ? हा प्रश्नही या निमित्ताने या ठिकाणी उभा राहतो आहे. एवढा मोठा भव्य-दिव्य कार्यक्रम ठेवून त्याचे एवढे भव्य स्वरूपात नियोजन करणारे आयोजक-संयोजक काय झोपा काढत होते का? या अशा कार्यक्रमांना कोणी आले पाहिजे आणि कोणी नाही याबाबत काही सुसूत्रता त्यांच्याकडे नाही काय? सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत नाच-गाण्यांचचे कार्यक्रम आयोजित करायचेच आहेत तर मग अशा कार्यक्रमांसाठी वयाची वाट नाही का? आणि जर असेल तर अठरा वर्षाखालील अल्पवयीन मुलांना का रोखले गेले नाही. का? मग अगोदरच बेफान बिघडलेल्या व्यसनाधीन तरुण तरुणाईला अजूनच बिघडून टाकून नेमके नाथ प्रतिष्ठानला यातून काय साधायचे आहे का...? याला आयोजक-संयोजक जबाबदार नाहीत का...? असे प्रश्नही या निमित्ताने या ठिकाणी उपस्थित होत आहेत.

शेवटी यातून एक मात्र स्पष्ट होत आहे की, नाथ प्रतिष्ठानने जरीकरिता स्वच्छ भावनेतून अशा कार्यक्रमांचे आयोजन केले असले तरी मात्र याकडे तरुणाईचा, विशेषतः अल्पवयीन तरुणांचा पाहण्याचा दृष्टिकोन फारच वेगळा असल्याने मुळातच बदनाम असलेल्या परळी शहर-तालुक्याला या अशा प्रकारामुळे अजूनच नामुष्की ओढावून घेण्याची वेळ या घटनेमुळे आली आहे. परंतु मुळातच आपल्या पाल्यांमुळे हैराण असलेले माता-पालक या अशामुळे तर अजूनच परेशान झाल्याचे दिसून येत आहे. तेंव्हा आपली भावना कितीही चांगली असली तरी काही उन्माद कार्यकर्त्यांमुळे जर या अशा कार्यक्रमांना गालबोट लागणार असेल तर आणि भविष्यात प्रतिष्ठान-शहर-तालुका व पालकांची बेईज्जत होणार असेल तर येणाऱ्या काळात ऐकतर कार्यक्रमांच्या स्वरूपात तरी बदल करावा लागेल अन्यथा नियमांचे काटेकोर पालन करत कार्यक्रमस्थळी प्रवेशाला एकच प्रवेशद्वार ठेवून आतमधे केवळ अठरा वर्षापुढील युवकांना प्रवेश देऊन मंडपात कडक पोलीस बंदोबस्त ठेवून वेळप्रसंगी कार्यकर्ता आपला असो की कोणताही अशा अनुचित प्रकाराची चाहूल जरी लागली तरी त्यास वेळप्रसंगी खाकीचा धाक हा दाखवावाच लागेल. तरच येणाऱ्या काळात परळी सारख्या संवेदनशील शहरात नाच-गाणे, लावण्यांसारखे कलाविष्कार व्यवस्थितरित्या पार पडतील नाहीतर एक दिवस राजकारणापायी अलौकिक सामाजिक कार्य करणाऱ्या नाथ प्रतिष्ठानवरती 'मुन्नी बदनाम हुई, डार्लिंग तेरे लिये....!' असे म्हणण्याची वेळ येऊ नये म्हणजे नवलच !!

## 'मानवीय आहार-शाकाहार' पुस्तकाचे लोकार्पण



आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** ५ सप्टेंबर शिक्षक दिन निमित्त सांगली येथील साहित्यीक सचिन कुसनाळे यांच्या 'मानवीय आहार-शाकाहार' या पुस्तकाचे लोकार्पण नुकतेच शिरपूर जि. वाशिम येथे संपन्न झाले. सदर लोकार्पण सोहळ्यास प्राचार्य प्रशांत गडेकर, निसर्गोपचार तज्ज्ञ डॉक्टर मनीष सेठी, पूज्य तात्या भैय्याजी, प्रकाश बिलाला, संदीप देशमुख, निशा सेठी, मनिषा माणकापूरे, डॉ. स्मिता कुसनाळे तसेच खंडेलवाल महिला मंडळाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

आहार हेच मुख्यतः औषधाचे कार्य कसे करते, आहारातील उचित फेरबदल आपल्यास कसे स्वास्थ्यकारक ठरतात, यासंबंधी मार्गदर्शन निसर्गोपचार तज्ज्ञ डॉ. मनीष सेठी यांनी याप्रसंगी केले. शाकाहाराचा मानवतावादाशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंध, शाकाहारातील खासकरून फलाहाराविषयी कोरोना काळातील रूग्णांचे स्वानुभव, आपल्या आहाराची ज्ञानपूर्वक व सुपरिणाम पाहून निवड करण्याची गरज, पर्यावरण पूरक शाकाहार, माणसाचा प्राकृतिक आहार-शाकाहार, आहार विषयक तथ्ये व पथ्ये यांविषयी प्रा. प्रशांत गडेकर, लेखक सचिन कुसनाळे व अन्य मान्यवरांनी चर्चा केली.

साहित्यिक सचिन कुसनाळे हे दिपगंगा भागीरथी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे विशेष सल्लागार असून ते महाराष्ट्रातील प्रसिध्द साहित्यिक समाजसेवक हिंदरत्न दिपक लोंढे यांचे विश्वासू सहकारी आहेत. यांनी यापूर्वी जगा आणि जगू द्या, स्वातंत्र्यायण, विश्ववाद, असामान्यत्वचा सिद्धांत यांसह अनेक वैचारिक ग्रंथांचे लेखन केले आहे. कोल्हापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विद्यामंदिर गणेशवाडी ता. शिरोळ याठिकाणी विषय शिक्षक म्हणून ते कार्यरत आहेत.

## गणेश उत्सवानिमित्त जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** नंबर चॅम्पियन क्रीडा मंडळा तर्फे आयोजित जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेला सुरुवात झाली. या स्पर्धेच्या उद्‌घाटन समारंभ प्रसंगी आंतरराष्ट्रीय सध्या कस्टम संघाचे खेळाडू सिद्धांत शिंदे व एडविन यर्विन यांचा शाल श्रफळ देऊन तसेच फेटा बांधून त्यांचा सत्कार करण्यात आला. स्पर्धेच्या उद्‌घाटन समारंभ प्रसंगी संजय डोंगरे, अमोल झळके, निशांत आइझ्यक, साकेत देशमुख, स्पर्धेचे आयोजक संदीप ढंगारे, महेश इंगळे स्वप्नील पेरकर, अभिजित शिंदे यांची उपस्थिती होती.

स्पर्धेचा प्रेक्षणीय सामना चॅम्पियन्सक्रीडा मंडळ विरूद्धबी. बी.सी वयोगट 12 वर्ष मुले यांच्यात झाला.या सामन्यात चॅम्पियन्स संघाने 37/22a असाविजय मिळवला. या सामन्यात विजय संघाच्या शौर्य ढंगारे याने 11 गुण केले तसेच जय गुप्ता याने 8 गुण केले. या सामन्यात खेळाडूने प्रेक्षकांचे मन जिंकले

स्पर्धेचा दुसऱ्यासामन्यात वरिष्ठ गटात MH 20 संघाने ग्रामीण पोलिस संघावर 64/28 असा सहज विजय मिळविला. विजयीसंघाकडून प्रेम मिश्रायाने अचूक थ्रीपॉइंटमारत 13 गुण केले.

तिसरा सामना 14 वर्ष मुले या सामन्यात युनिटीसंघाने डीसीबीए संघाचा 22/13 गुणांनी पराभव केला. युनिट संघाकडून उत्कर्ष शर्मा याने सर्वाधिक 10 गुणाची खेळी केली.


स्पर्धा यशवी करण्यासाठी अभिजित शिंदे, महेश इंगळे, स्वप्नील पेरकर, शुभम गवळी, अजय सोनवणे, अभय हजारी, प्रदीप लाटे, सागर धटिंगण, अभिषेक अंभोरे, नरेंद्र चौधरी, जयराज तिवारी आदी परिश्रम घेत आहेत.

## डॉ. इं.भा. पाठक महिला महाविद्यालयात राष्ट्रीय पोषण सप्ताह उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज









1 ते 7 सप्टेंबर हा राष्ट्रीय पोषण सप्ताह सौ. इं. भा. पाठक महिला महाविद्यालयात विविध उपक्रमाचे आयोजन करून उत्साहात साजरा करण्यात आला. या अंतर्गत 'कच्च्या अन्नपदार्थां' पासून दागिने तयार करणे' आणि "तिरंगी पोषक पाककला स्पर्धेचे' आयोजन करण्यात आले. दोन्ही स्पर्धेत विद्यार्थिनींनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

पाककला स्पर्धेत तिरंगी डोसा, ढोकळा, केक, पुलाव, आप्पे, पूरी, पराठे असे अनेक बीट, गाजर, पालक, केसर यांच्या मदतीने नैसर्गिक रंगाचा वापर करून पौष्टिक पदार्थ तयार केले. अन्नपदार्थापासून दागिने बनवण्यासाठी कच्चे गाजर, बीट, मुळा, हिरवे कारले, वाटाणे शेंगा, भेंडी, पुदिना, डाळिंब, डाळी, मसाल्याचे पदार्थ यांचा सृजनात्मकरित्या उपयोग विद्यार्थिनींनी केला. यामधून विद्यार्थिनींची कलात्मकता दिसून आली. स्पर्धेनंतर स्पर्धकाच्या पाककृती आणि दागिन्यांचे प्रदर्शन महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांसाठी खुले करण्यात आले.

उत्कृष्ट पाककृती व दागिने तयार केलेल्या विद्यार्थिनींचा कौतुक सोहळा प्राचार्य डॉक्टर वसुधा पुरोहित यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या कार्यक्रमात 'सकस आहाराचे महत्व' या विषयावर डॉ. सुरेखा भवर यांनी व्याख्यान दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गृहशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अन्विता अग्रवाल, सूत्रसंचालन प्रा. मंगल मोरे, बक्षीस वितरण संचलन डॉ. शीला जीरे आणि आभार प्रकटन प्रा. वर्षा पाईकराव यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. वसुधा पुरोहित यांनी आहारामधून निरनिराळे पोषण मिळत असते असे सांगितले व पोषक तत्वे आणि आरोग्याबद्दल जागृतता निर्माण केली. या निमित्ताने आयोजित नाविन्यपूर्ण स्पर्धांचे यशस्वी आयोजनाबद्दल त्यांनी गृहशास्त्र विभागाचे आणि विद्यार्थिनींचे भरभरून कौतुक केले.




## अष्टविनायक मंदिर... पन्नालालनगर

आधुनिक केसरी



सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

अतिशय स्वच्छ सुंदर अखीव रेखीव असणारं पुण्याच्या प्रभात रोडची आठवण करून देणाऱ्या या पन्नालाल नगरात तितक्याच अप्रतिम सौंदर्याने परिपूर्ण असं बांधलेलं हे अष्टविनायकाचे मंदिर. अत्यंत भावपूर्ण वाटावे इतका सुंदर आहे. शंकरराव कोपळकर , दादासाहेब बापट , गोपाळराव वझे , प्रभाकरराव सातारकर, सुरेशराव दीक्षित , डॉक्टर बाबुराव जयस्वाल , या मंडळीच्या पुढाकारातून 1985 सालात पन्नालाल नगर विकास संस्थेची स्थापना झाली. त्याचवेळी या गणेश मंदिराची संकल्पना गोपाळराव वझे यांच्या मनात आली आणि त्यानंतर गोपाळराव वझे यांच्या अध्यक्षतेखालीच ती साकारली देखील.

अष्टविनायकाचे हे मंदिर पश्चिमाभिमुख आहे. गणेश मूर्ती ही साधारणता



पाच फूट उंचीची आहे. राजस्थानातील कुशल कामगारांनी जयपूर येथे ही तयार केलेली अतिशय सुंदर भावपूर्ण मूर्ती आहे .गणेश मंदिरात नैमित्तिक कार्यक्रम साजरे केले जातात. संकष्ट चतुर्थीला भक्तगण हजारो संख्येने उपस्थित राहतात .मंदिराचे पुजारी हे नित्यनेमाने पूजाअर्चाभिषेक अथर्वशीर्षाची आवर्तने करीत असतात. भक्तगण 10001 रुपये भरून सदस्य झाल्यावर त्याच्या व्याजातून त्या सदस्याच्या नावाने संकष्टीला अभिषेक करून त्याचा प्रसाद घरी घरपोच पोस्टाने पाठवला जातो.

अष्टविनायक मंदिराच्या माध्यमातून अनेक समाजभिमुख कार्यक्रमाचे आयोजन नियमित केले जाते. गरीब मुलांच्या वस्तीग्रह चे पालकत्व स्वीकारून त्यांना मोठी मदत मंदिराच्या वतीने केली जाते. कथा कीर्तने प्रवचने संगीत महोत्सव भावगीत भक्ती गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन देखील मंदिराच्या माध्यमातून बऱ्याच वेळा वर्षभर केले जाते.

अष्टविनायक मंदिरात वर्ष प्रतिबतेस मंदिरावर धर्मद्वज फडकविला जातो.. आणि मंदिरात होणाऱ्या कार्यक्रमाची सुरुवात केली जाते. त्याचप्रमाणे रामनवमी , हनुमान जयंती , कृष्ण जन्माष्टमी , दत्त जयंती , अशा अनेक उत्सव या मंदिराच्या माध्यमातून मोठ्या उत्साहाने करण्याची परंपरा आजही कायम आहे. संपूर्ण कार्यक्रमाची आखणी केली जाऊन वर्षभराचे कार्यक्रमाची पत्रिका प्रत्येक सदस्यांच्या हाती दिले जाते. मंदिराच्या बाहेर विश्रांतीसाठी काही बाग ठेवलेले आहेत. मंदिर परिसर अतिशय विलक्षण सुंदर स्वच्छ असल्यामुळे मंदिरात एकदा येणारा भक्तगण हा वारंवार या गणेशाचे दर्शन घेण्यासाठी येतो आणि आत्मिक समाधानाने आपल्या घरी परततो हेच खरं.

# मुख्यालयी राहण्याच्या आदेशाचे वाजले बारा. !

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** महाराष्ट्र शासनाने कर्मचाऱ्यांना आपला मुख्यालयी राहणे बंधनकारक केले असतानादेखील परिसरातील कर्मचारी, अधिकारी मुख्यालयात राहात नसल्याची ओरड दिवसेंदिवस ग्रामीण व शहरी कार्यालयात वाढत आहे. या मुख्यालयात न राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने कठोर कारवाई करून त्यांना मुख्यालयी राहण्याची सक्ती करावी अशी मागणी ग्रामीण जनतेने केली आहे.

औरंगाबाद मधील शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांना आपल्या मुख्यालयी राहणे बंधनकारक केले असताना ग्रामीण भागातील शिक्षक, डॉक्टर, तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक, बँक कर्मचारी, आरोग्य कर्मचारी, विद्युत कर्मचारी व इतर कर्मचाऱ्यांनी शासनाच्या आदेशाचे तीन-तेरा वाजवून आदेशाला न जुमानता तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या व उपराजधानीच्या ठिकाणावरून ये-जा करतात. हे सर्व शासकीय कर्मचारी मुख्यालयी न राहता स्थानिक नागरिकांकडून उलट सांगून मुख्यालयात असल्याचे दाखले घेऊन मुख्यालयी असल्याचे भासवत आहेत. सरपंचांना हाती धरून मुख्यालयी राहात असल्याचे दाखले कर्मचाऱ्यांना दिले जातात. त्यामुळे ते घरभाड्याची उचल करतात. कर्मचारी ही बनवाबनवी प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या व लोकप्रतिनिधींच्या डोळ्यासमोर करीत असूनदेखील प्रशासकीय अधिकारी लोकप्रतिनिधी या कर्मचाऱ्यांची पाठ राखण करीत आहेत. शासन ग्रामीण भागातील जनतेच्या विकास होण्याच्या उद्देशाने ग्रामसेवक, तलाठी व शिक्षक, डॉक्टर, आरोग्य कर्मचारी, कृषी सहायक, केंद्रप्रमुख, विद्युत कर्मचारी यांना मुख्यालयी राहणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील शासकीय कर्मचारी मुख्यालयी राहात असतील तर गावाचा विकास झपाट्याने होतो. शासकीय सेवेमध्ये रुजू होताना मुख्यालयी राहण्याकरिता शासकीय कर्मचाऱ्यांना सोयी उपलब्ध करून दिल्या जातात. तिरोडा तालुका नक्षलग्रस्त असल्याचा फायदासुध्दा हे कर्मचारी घेत आहेत. शिक्षणाच्या वाटा मोकळ्या करून दिल्या. ग्रामीण भागातील मुला-मुलींना शिक्षण घेणे सोपे व्हावे याकरिता शासनाने अनेक उपक्रम सुरू केले. पण ग्रामीण भागातील शिक्षकच मुख्यालयी राहत नसल्याने विद्यार्थ्यांवर वचक बसत नाही. शाळेतील पालक-शिक्षक संघ आणि इतर समित्या फक्त कागदावर असून याकडे कोणतेच प्रशासकीय अधिकारी किंवा लोकप्रतिनिधी लक्ष देण्यास तयार नाही. कर्मचाऱ्यांवर लोकप्रतिनिधींचा वचक नसल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या मनमर्जीने कामकाज सुरू आहे.

शासकीय कर्मचारी जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या ठिकाणी राहून स्वतःच्या मुलांना शहरातील शाळांमध्ये शिक्षण देतात. शहरी भागात राहून शासकीय कर्मचारी मोटारसायकलने ये-जा करतात. मुख्यालयी न राहता कित्येकदा हे कर्मचारी केव्हा येतात आणि कधी निघून जातात, हे कळायला मार्गच नाही. ग्रामीण भागात ग्रामसेवक, शिक्षक, तलाठी, डॉक्टर, आरोग्य कर्मचारी, कृषी सहायक, विद्युत कर्मचारी राहात नसल्यामुळे जनतेला मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो. शासनाचे करोडो रुपये, घर भाडे फुकट कर्मचारी घेत आहे. प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मुख्यालयी न राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या औरंगाबादेतील विभागीय कार्यालयात श्रीगणेशाची सायंकाळची आरती भाजपच्या उधोग आघाडीचे शहर-जिल्हा उपाध्यक्ष मधुर अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आली. सोबत जिल्हाध्यक्ष डॉ.प्रभू गोरे,संघटक विलास शिंगी ,उपाध्यक्ष छब्बुराव ताके,कोषाध्यक्ष मुकेश मुंदडा, प्रसिद्धी प्रमुख मनोज पाटणी,संजय व्यापारी आदींची उपस्थिती होती.

# 'मातंग एकता आंदोलन'मध्ये शेकडो कार्यकर्त्यांचा प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** "मातंग एकता आंदोलन" या राज्यव्यापी सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्याचे माजी गृहराज्यमंत्री रमेश दादा बागवे यांच्या मार्गदर्शनाखाली संभाजीनगर शहरातील सुभेदारी विश्रामगृहात झालेल्या बैठकीत रमेश दादा बागवे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शेकडो कार्यकर्त्यांनी संघटनेत जाहीर प्रवेश केला. मार्गदर्शक तथा सल्लागार राजु आहिरे, जिल्हाध्यक्ष संदीप मानकर, जिल्हा सचिव अशोक शिरसाठ, शहराध्यक्ष किशोर तुपे, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा राजश्री साठे आदींच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

या निवडीत साहेबराव दणके, समाधान लोखंडे, गजानन मानकर, विशाल आहिरे, भरत मानकर, शिवदास दणके, दिपक सोनवणे, श्रीकांत मानकर, विजय कसारे, ज्ञानेश्वर निकाळजे, कैलास भालेराव, जना भाऊ खोतकर, विक्की लोखंडे, नरेंद्र भालेराव, रवि कसारे नायगांव, नारायण साळवे, ज्ञानेश्वर जगताप, प्रकाश साळवे, सुरेश चंदनशिव, रावसाहेब मोटे, भगवान सोनवणे, लक्ष्मण दणके, संगिता पाटोळे, स्वाती जोगदंडे, कचरुबाई आहिरे आदी पदाधिकाऱ्यांच्या जिल्हा, तालुका, विभाग, सर्कल स्तरांवर नियुक्त्या करण्यात आल्या.

यांवेळी उपस्थित मान्यवरांनी निवड झालेल्या सर्वांचे अभिनंदन करुन त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मार्गदर्शक तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य राजु आहिरे, पं.स.सदस्य भगवान कारके, ज्येष्ठ नेते राजु खाजेकर, जिल्हा सचिव अशोक शिरसाठ यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. जिल्हाध्यक्ष संदीप मानकर यांनी प्रास्ताविक केले, सूत्रसंचालन जिल्हा संघटक भरत मानकर यांनी केले तर आभार शहराध्यक्ष किशोर तुपे यांनी मानले.

याप्रसंगी महिला आघाडी जिल्हाध्यक्षा राजश्री साठे, युवा नेते योगेश दणके, काकासाहेब भालेराव, आडगांव उपसरपंच विलास खोतकर, संतोष गायकवाड, विलास भालेराव, विजय आहिरे, संतोष गायकवाड, कृष्णा निकाळजे, श्रीकांत मानकर, ज्ञानेश्वर निकाळजे, गजानन मानकर, सुरेश चंदनशिव, नरेंद्र भालेराव, सागर निकाळजे, प्रविण कसारे, विकास साळवे, नारायण साळवे, कैलास भालेराव, विलास भालेराव, काकासाहेब भालेराव, विक्की लोखंडे, विजय कसारे, शिवाजी नाडे, रवि कसारे, अंकुश कसारे, संजय पवार, सुनील कसारे, दिपक कसारे, रावसाहेब मोटे, कैलास भाले, गणेश साळवे, कडूबा कसारे, जना भाऊ खोतकर, शुभम चिडे, विलास खोतकर, स्वाती जोगदंडे, कोमल पाटोळे, संगिता पाटोळे, कचराबाई पोळ, दिपक सोनवणे, भगवान सोनवणे, कृष्णा सोनवणे, अनिल सोनवणे, अनिल भालेराव आदींसहित असंख्य कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही काळाची गरज : बिघोत

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**औरंगाबाद :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या औरंगाबाद येथील विभागीय कार्यालयात गणपतीची आरती वैजापुर नगर परिषदेचे मुख्याधिकारी भागवत बिघोत यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष शांताराम मगर, बाळासाहेब बोरसे, प्रसिध्दी प्रमुख मनोज पाटणी, आधुनिक केसरीचे व्यवस्थापकीय संपादक संजय व्यापारी आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळेस बोलताना भगवान बिघोत म्हणाले की, भारतासह देशविदेशात पोहोचलेला गणेशोत्सव काळानुरूप बदलत आहे. मात्र आज साजरे होणारे गणेशोत्सव हे पर्यावरणाला हानीकारक तर ठरत नाहीत ना, याकडे मात्र लक्ष देण्याची वेळ आली आहे.

गणपती हे आराध्य दैवत म्हणून ओळखले जाते. चतुर्थीला गणरायाची विधिवत प्रतिष्ठापना करून त्याची मनोभावे पूजा केली जाते. गणेशोत्सवाचे महत्त्व लक्षात घेऊनच लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लोकसहभाग महत्त्वाचा मानून त्याला सार्वजनिक रूप दिले. कोणताही उत्सव साजरा करताना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची काळजी आपण सर्वांनी घेणे आवश्यक आहे.

गणेशोत्सवामधील पावित्र्य आणि पर्यावरण संरक्षण यासाठी गणेशोत्सव पर्यावरण पूरक पद्धतीने साजरा होणे ही काळाची गरज आहे. यासाठी आपण सर्वांनी आग्रही राहिले पाहिजे. प्रत्येकाने आपला दृष्टिकोन पर्यावरणस्नेही ठेवला तरच उत्सव साजरे करण्याबाबत सामाजिक परिवर्तन होऊ शकेल.

आज आपण पर्यावरणाविषयी अधिक सजग झालो आहोत. त्यामुळे आपले प्रत्येक सण आणि उत्सव हे पर्यावरणपूरक पध्दतीने साजरे होणे आवश्यक आहे. गणेशोत्सव सुध्दा पर्यावरणपूरकच असायला हवा, कारण पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही काळाची गरज आहे. पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी राज्य शासन प्रयत्न



करीत आहे. पण या प्रयत्नात आपण आपलाही सहभाग नोंदवूया. आपण आपले सगळे उत्सव आणि सण यापुढे पर्यावरणपूरक पध्दतीने साजरे व्हावे यासाठी आग्रह धरला पाहीजेत.

पर्यावरणाचे रक्षण करण्याची राज्य शासनाची जबाबदारी असली तरी पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करणे ही आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे.

कोणतेही सामाजिक बदल आपल्याला आत्मसात करण्यासाठी वेळ लागतो, पण आपली मानसिकता आपण बदलली तर आपण स्वता पासुन सुरुवात केली तर नक्कीच बदल घडवू शकतो.

लोकमान्य टिळकांनी सुरु केलेल्या गणेशोत्सवाचे महत्व आजच्या बदलत्या काळात आणि परिस्थितीतही टिकून आहे. हा उत्सव हा पारंपरिक पद्धतीने साजरा करताना तो पर्यावरणपूरक पद्धतीनेही साजरा करुण

शांततापूर्ण वातावरणात, सुरक्षाविषयक सर्व प्रकारची काळजी, ध्वनी प्रदूषणविषयक सर्व कायदे काटेकोरपणे पाळून हा उत्सव साजरा करतांना गणराय म्हणजे ज्ञान आणि बुद्धीची देवता.

मांगल्यदेवता आणि बुद्धीदेवतेचा हा उत्सव असून या उत्सवाला ऐतिहासिक परंपरा आहे. गणेशोत्सव घरगुती आणि सार्वजनिक स्वरुपात साजरा केला जातो. तो साजरा करीत असताना पर्यावरणपूरक होईल, तसेच या कालावधीत पर्यावरणाच्या संरक्षण आणि संवर्धनाची काळजी घेतली जाईल, हे पाहणे आपल्या सर्वांचे नैतिक आणि राष्ट्रीय कर्तव्य आहे.

गणेशोत्सव काळात होणारा थर्माकोल आणि प्लॅस्टिकचा वापर पर्यावरणाला हानी पोहचवत असल्यानं तो कटाक्षाने टाळायला हवा. प्लॅस्टर ऑफ पॅरीसच्या मूर्ती, तसेच मोठया आकाराच्या मूर्तींमुळे विसर्जनाच्यावेळी होणारे पाण्याचे प्रदूषण जैवविविधतेला गंभीर धोका निर्माण करणारे असते, त्यामुळे त्याचाही आज गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. ध्वनीक्षेपक आणि डॉल्बीसारख्या मोठया आवाजातील वाद्यांमुळे होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाने मानवी आरोग्यावर गंभीर दुष्परिणाम होत असतात.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी आपण स्वतःसह अधिकाधिक लोकांना प्रोत्साहित करा. गणेशोत्सव हा आपल्या अस्मितेचा, परंपरेचा आणि संस्कृतीचा ठेवा आहे. गणपतीच्या मूर्ती पर्यावरणपूरक असल्यास गणपतीचे विर्सजन केल्यानंतर या मूर्ती तत्काळ विसर्जित होतात. म्हणूनच आपण प्रत्येकाने पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्यावर भर द्या.

गणपती विसर्जित केल्यावर गणपतीच्या मूर्तीची आणि निर्माल्य यांची होणारी दशा आपण पाहतो. यामुळेच आपला दृष्टीकोन बदलून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा होणे आवश्यक आहे. वाढते प्रदूषण, जागतिक तापमानवाढ आणि वाढते नदी प्रदूषण व त्याचे होणारे परिणाम या पार्श्वकभूमीवर "पर्यावरणपूरक गणेशोत्सवा'चा नवा मूलमंत्र आपण जपणे आवश्यक आसुसून

गणेशोत्सवाच्या काळात ध्वनी आणि जलप्रदूषण मोठया प्रमाणावर होते. हे प्रदूषण थांबविणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे यासाठी पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही संकल्पना पुढे आली. आता विविध स्वयंसेवी संस्था, विविध शासकीय विभाग पर्यावरणपूरकतेचा आग्रह धरतात. ध्वनिप्रदूषण थांबवण्यासाठी ढोल-ताशा पथक व स्पीकरवर पोलिसांनी निर्बंध घातले आहेत. निर्माल्य व गणेशमूर्ती नदीत विसर्जित केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर जलप्रदूषण होते पण दर वर्षीप्रमाणे निर्माल्यसाठी कलश व गणेश मूर्ती विसर्जित करण्यासाठी कृत्रीम हौदांचा पर्यायही अनेक ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येत असल्याने जलप्रदूषण रोखण्यास मदत होते.

# महामानवाच्या विद्यापीठाचा सन्मान वाढला पाहिजे : डॉ. येवले

## देवगिरी बँकेत कुलगुरू व संस्थाचालकांमध्ये मुक्तसंवाद

आधुनिक केसरी न्यूज

देवगिरी बँक कर्मचारी संघाचे वतीने प्रतिवर्षीप्रमाणे गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने शिक्षक दिनाचे औचित्य साधुन देवगिरी बँक कर्मचारी संघामार्फत डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ प्रमोद येवले तसेच शहरातील नामांकीत संस्थांचे प्रतिनीधी यांना कर्मचारी संघाच्या गणपती आरतीसाठी आमंत्रित करुन मुक्तसंवाद व सत्कार समारंभ आयोजीत करण्यात आला होता, अध्यक्ष म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक अनिल भालेराव उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना कुलगुरूं डॉ. येवलेंनी विद्यापिठाचे नावलौकीक वाढविण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी संस्था नी गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले पाहीजे, कोणतेही कॉलेज आम्हाला बंद करण्याची इच्छा नसून, प्रत्येक संस्थेला दोष पूर्तता करण्यासाठी नक्की पुरेसा वेळ देऊ, पण विध्यार्थ्यांच्या भविष्याशी कोणीही खेळू नये. महामानवाच्या विद्यापीठाचा सन्मान वाढविण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. त्यासाठी विद्यापीठा सोबत प्रत्येकाने कार्यरत राहिले पाहिजे.



संस्था चालकांनीही त्यांच्या विविध समस्या मांडल्या. कुलगुरूंनी सदर समस्यांचे निराकरण सकारात्मक पद्धतीने केले. बैठक खूपच मोकळ्या वातावरणात पार पडली. या कार्यक्रमास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक श्री अनिलजी भालेराव हे अध्यक्ष म्हणून उपस्तिथी होते.

अनिल भालेराव यांनी बोलतांना म्हणाले की असा मुक्त संवाद नियमित संस्था व विद्यापीठात होत राहिला पाहिजे, देवगिरी बँकेने हे घडवून आणल्या बद्दल अभिनंदन केले. बँकेचे अध्यक्ष आणि विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य किशोरजी शितोळे यांनी हा हितगुज कार्यक्रम घडवून आणण्यात मुख्य भूमिका बजावली. शिक्षक दिन अश्या अनोख्या पद्धतीने साजरा केल्याबद्दल उपस्थितांनी कौतुक केले. या कार्यक्रमास बस्वराज मंगरुळे(श्रेयस महाविद्यालय), मुनिष शर्मा (एमआयटी कॉलेज), प्रसाद कोकीळ (सरस्वती भुवन शिक्षण संस्था), प्रकाश काळे (सचिव अजिंठा शिक्षण संस्था), ॲड. श्रीकांत अदवंत (मराठवाडा लीगल एज्यूकेशन सोसायटी), पंकज भरसाखळे (अश्वघोष एज्युकेशन अँड व्यायाम प्रसारक मंडळ), नितीन राठोड (वसंतराव नाईक महाविद्यालय), विजय राऊत/ जयस्वाल (दगडोजीराव देशमुख महाविद्यालय), योगिता पाटील (अध्यक्ष अ. भा. वि.प. संभाजीनगर) यांची यावेळेस उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर यांनी केले तर उपाध्यक्ष प्रा.संजय गायकवाड यांनी आभार मानले. देवगिरी बँक कर्मचारी संघाचे प्रतिनिधि व बँकेचे कर्मचारी या प्रसंगी उपस्थित होते.

# गावठाण जागेवरील अतिक्रमण काढून घरकुलासाठी जागा उपलब्ध करून द्या

## बल्हाणे येथील ग्रामस्थांची प्रांत अधिकाऱ्यांना निवेदनातून मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यातील बल्हाणे गावातील काही नागरिकांनी बेकायदेशीररित्या शासकीय गावठाण जागेवर अतिक्रमण करून ठेवलेले आहे या समस्येमुळे घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना हक्काचे घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध होत नसल्याने त्यांना उघड्यावर संसार थाटण्याची वेळ येऊ घातली आहे त्यामुळे प्रशासनाने याकडे त्वरित लक्ष देऊन गावठाण जागा घरकुलासाठी मोकळी करून देण्यात यावी अशा मागणीचे निवेदन आज सामाजिक कार्यकर्ते राजकुमार सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली बल्हाणे येथील ग्रामस्थांनी धुळे जिल्हा प्रांताधिकारी प्रशासनाला दिले आहे.

ग्रामीण भागातील सर्व बेघर कुटुंबांना घर देण्याची महत्त्वाकांक्षी मोहीम केंद्र व राज्याने हाती घेतली आहे. केंद्राची प्रधानमंत्री आवास योजना, राज्याची रमाई आवास, शबरी आवास व इतर योजनांतून लाभार्थींना मदत केली जाते. मात्र ग्रामीण भागात शासकीय गावठाण जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले जात असल्याने लाभार्थ्यांनी खरे कुठे बांधावी असा प्रश्न निर्माण होत आहे तालुक्यातील




बल्हाने या गावी देखील काही नागरिकांनी खळ्यासाठी जागा बेकायदेशीर ताब्यात अडकून ठेवलेली आहे. तर काहींनी गावठाण वरील जागा सांभाळण्याचे उद्देशाने काटेरी कुंपणही करून ठेवलेली आहे त्यामुळे अनेकांना घरकुल योजनेच्या माध्यमातून घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने लाभार्थी या योजनेपासून वंचित दिसून येत आहे.

त्यामुळे हे गावठाण जागेवरील अतिक्रमण काढण्यात यावे अशा मागणीचे निवेदन धुळे जिल्हा प्रांताधिकारी प्रशासनाला देण्यात आल आहे.

याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते राजकुमार सोनवणे, भुरमल दामू भिल, दिलीप रावण मोरे , प्रवीण मोरे, व आदी बल्हाने गावातील ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

# देवरे विद्यालयात शिक्षक दिनी विद्यार्थ्यांनी साकारली शिक्षकांची भूमिका

आधुनिक केसरी न्यूज

**विखरण :** आप्पासो. आत्माराम धवळू देवरे माध्यमिक विद्यालय विखरण विद्यालयात भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्त शिक्षक कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक डी. डी. साळुंके यांनी प्रतिमा पूजन केले. विद्यार्थ्यांनी जादा तास व शालेय तासिका घेऊन अध्यापन कार्यांचा अनुभव घेतला. नंतर प्रांगणात सर्व गुरुजनांचा गुलाबपुष्प व पेन देऊन विद्यार्थ्यांनी गुरू गौरव केला. विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व तर विद्यार्थी-शिक्षकांनी वर्गाध्यापनाचा अनुभव व्यक्त केला. शिक्षक दिनाचे मुख्याध्यापक चि. तेजस पाटील याने विविधांगी अनुभव तसेच झालेल्या धावपळीचे वर्णन रंजकतेने केले. कार्यक्रमाचे व्याख्याते डी. बी. भारती यांनी 'शिक्षकदिनाचे महत्त्व व आजची शिक्षकांप्रतीची भूमिका' विषयावर व्याख्यान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. प्रतिक्षा कुभांर, कु. रुपाली पाटील, कु. हर्षदा पानपाटील, कु. पुनम कोळी आभार कु. भाग्यश्री पाटील हिने मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी इ. ९ वी, १० वीच्या विद्यार्थ्यांनी तसेच उपशिक्षक के. पी. देवरे, एम. डी. नेरकर, वाय. डी. बागुल, व्ही. बी. अहिरे, एस. एच. गायकवाड, आर. एम. पाटील, एम. आर. भामरे, एस. जी. पाटील यांनी परिश्रम घेतले.

# गिरीजा शंकर विहार सोसायटी, गणेशोत्सव उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** कर्वेनगर येथील गिरीजा शंकर विहार सोसायटीमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सव साजरा करण्यात आला. सात दिवसांच्या ह्या महोत्सवात प्रवचन, भावभक्तीरंग मैफिल असे धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. प्रसिद्ध संगीतकार अविनाश - विश्वजीत यांचा ऋषीकेश रानडे यांच्याबरोबर "प्रवास" हा सांगीतिक कार्यक्रम संपन्न झाला.हिंदी मराठी गीतांचा ऑर्केष्ट्रा व अनेक मनोरंजनपर कार्यक्रम घेण्यात आले. मुलांसाठी विविध स्पर्द्धा व क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. गिरीजा शंकर विहार सोसायटीतील रहिवाशी अर्जुन पुरस्कारप्राप्त व आंतरराष्ट्रीय टेनिसपटू अंकिता रैना हीचा सत्कार सोसायटीच्या वतीने पुष्पगुच्छ, शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच अंकिता रैना हिच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यवस्थापन समितीचे सदस्य अरुण दिघे हे होते तर प्रमुख पाहुणे जेष्ठ नागरिक मंचचे राजेंद्र सिंग हे होते. कार्यक्रमास गिरीजा शंकर विहार सोसायटीचे नागरिक,महिला मोठ्या संख्येने सर्व कार्यक्रमात सहभागी झाले होते.



अर्जुन पुरस्कार प्राप्त व आंतरराष्ट्रीय टेनिस पटू अंकिता रैना हिच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

# धान्य व फुलांपासून रांगोळीतून साकारले गणेश



आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** गणेशोत्सव 2022 स्वा सावरकर कनिष्ठ महाविद्यालयात कलाविष्कार अंतर्गत रांगोळीतुन विद्यार्थीनीनी धान्य व फुला, पानपासुन गणेशाची विविध रुपे साकारली. यावेळी विद्यार्थीनीसाठी कलोपासक मडंळ अंतर्गत धान्यापासून रांगोळी स्पर्धा आयोजित केली यावेळी रांगोळीची पाहणी करताना. अर्थ समिती सदस्य ॲड. अनिल तिडके, ॲड. राम बिरंगळ, प्रा. बाळासाहेब साळवे, प्रा. विठ्ठल वाघिरकर, प्रा.अंजली देशमुख प्रा. निशा जेवुरकर व सहभागी विद्यार्थीनी सहभाग. प्रा शशिकांत पसारकर, मनिषा कुलकर्णी व सहकारी प्राध्यापकांनी आयोजन करण्यास साह्य केले.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## हनिमून भाग - २

आधुनिक केसरी

यामध्ये अजूनएक ऑडिशनल अशी हॅण्डबॅग घेता येईल ज्यात, बीचवर फिरायला जाताना, महत्त्वाच्या ज्वेलरीज ठेवल्या जाऊ शकतात किंवा एखादी छोटी पर्स जी खांद्यावर टाकता येऊ शकेल. ज्यामध्ये महत्त्वाचे पेपर्स, पासपोर्ट, आय.डी.प्रूफ व कॅश ठेवता येऊ शकेल जे की जास्त सुरक्षित असेल.

**स्कर्ट किंवा ड्रेसेस कसे असावेत ?**

सहजतेने घातला वा काढता येतील असे कपडे असावेत. ज्याला आपण नेटेड पॅटर्न (जाळीदार) तसेच तो चांगला आकर्षक असेल याची काळजी घ्यावी.

**पॅन्ट :** कॉटन किंवा लिननच्या पॅन्ट्स किंवा लाईट वेट डेनिम वापरावे आणि त्याचा रंग सहसा पांढरा असावा. सहसा स्ट्रेचेबल फॅब्रिरीक असेच वॉश ॲण्ड वेअर असे असावेत. विनाकारण बॅगेचे वजन वाढेल अशा जीन्स पॅन्ट्स घेऊन जाऊ नये.

**शॉर्टस :** २ ते ३ कॅज्युअल शॉर्टस असाव्यात, जर बीचवर जायचे असेल तर एक अतिरिक्त सेटसोबत असावा सहसा पाण्यात चप्पल, वेट प्रूफ जाड सोल असलेले वापरावेत.

**शर्ट :** कॉटन टी शर्ट सोबत असावेत ज्याचे २-३ सेट असावेत. बीच बीअर - बिकिनी - २ स्वीम सुट्स असावेत. सूर्य प्रकाशात फिरायचे असेल तर हॅट आणि गॉगल्सही असावेत.

**लिंगरी किंवा स्लीप वेअर :** स्ट्रीप लेस ब्रा किंवा स्ट्रेच टॉप आणि सॉक्स, लेगीज सोबत असावेत.

**स्वेटर :** लाईट वेट स्वेटर असावे.

**शूज :** ब्लॅक कलर व लो हिल असे असावेत. एखादा स्पोर्टस् शूजचा सेट देखील असावा. पाण्यात चालण्यासाठी स्पेशल जाड तळव्याचे व रफ सरर्फेसचे स्लीपर असावेत. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com